गुरूवार, १५ डिसेंबर २०२२
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१२०
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 15 DECEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-120 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5

# दुष्काळग्रस्त गावात 'हरियाली' योजनेचा दुष्काळ

## ९ गावांतील कामांच्या निधीवर नियम धाब्यावर बसवून कर्मचाऱ्यांचा डल्ला

आधुनिक केसरी न्यूज

सिंचनाचा बट्ट्याबोळ भाग-२

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना समृध्द करण्यासाठी केंद्र सरकारने राबवलेल्या योजनेवर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनीच डल्ला मारला. शासकीय नियमांची ऐसीतैसी करत लाखोंचा निधी आपल्या पदरात पाडून घेतला. सरकारी यंत्रणांनी डोळेझाक करुन होणाऱ्या भ्रष्टाचाराकडे कानाडोळा केला. परिणामी 'झकास योजनेचा भकास बोजवारा' झाला. नियमानुसार समितीवर अध्यक्ष व सचिव हे गावातील रहिवासी असणे बंधनकारक असताना त्या ठिकाणी बोगस कागदपत्रे लावून कर्मचारी अध्यक्ष व सचिव झाले. त्यामुळे शासनाचा निधी आपोआप कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा झाला. विशेष म्हणजे या सर्व कर्मचाऱ्यांचे बँक खाते औरंगाबादच्या एकाच बँकेत असल्याचे समोर आले. नेमका कसा झाला घोटाळा याचा पर्दाफाश आधुनिक केसरी करीत आहे. (सविस्तर पान-3 )

ॐ महाकाल महाकाय महाकाल जगत्पत ।
महाकाल महायोगिन महाकाल नमोस्तुते ।।




उज्जैन या पावननगरीत बुधवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भगवान श्री महाकालेश्वर यांचे दर्शन घेतले.

# आपणच हरामखोरांना निवडून देतो

## ज्येष्ठ साहित्यिक भालचंद्र नेमाडेंचे संतप्त विधान

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव : खोक्यावरून सध्या राजकारणात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. मात्र आपणच हरामखोर लोकांना निवडून देतो, त्याची ही फळे आहेत, असे संतप्त विधान ज्येष्ठ साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांनी केले. सद्यस्थितीत राजकारणात चांगल्या लोकांनी पडू नये, अशी परिस्थिती झाली असून सर्वसामान्य माणसांना खोक्याची भाषा चालते का ? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. सध्या दहा ते पंधरा टक्के लोकांचे व्यवस्थित चालले असून अनेकांना मात्र उद्या काय खावे याची काळजी असते. त्यामुळे अशा लोकांनी आता कोणाला निवडून द्यावे, याचा विचार केला पाहिजे, तरच या लोकशाहीचा उपयोग होईल, असे नेमाडे यांनी जळगावमध्ये एका कार्यक्रमादरम्यान प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.**



लोक जर असेच मूर्ख राहिले तर असलेच सरकार येत राहणार, राष्ट्रवादामुळे आपल्या देशाचे नुकसान होत आहे. मुसलमानांपासून सर्वांनी या देशाला वर आणले आहे. पाकिस्तान, चीनमध्ये अत्यंत गरीब लोक असून पाकिस्तानात गरीब स्त्रिया, लहान मुलांना हातात घेऊन कामाला जातात. युद्ध करायचे म्हणजे तुम्ही त्या स्त्रियांवर बॉम्ब टाकाल, असेही नेमाडे म्हणाले. चिनी सरकार आपला शत्रू असेल, पण चीन हा आपला शत्रू म्हणणे चुकीचे असून चिनी सैनिक आपल्याकडे येतात, मारामाऱ्या करतात हे चुकीचे आहे. मात्र आपलेही सैनिक तेच करतात. दरम्यान, देशावर कायम युद्धाचे वातावरण असून अनेकांना खायला मिळत नाही, स्त्रियांना बाहेर पडता येत नाही, हे कसे सहन करायचे व अशी राष्ट्रीयता काय कामाची? असा सवालही शेवटी नेमाडे यांनी उपस्थित केला. नेमाडे यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात उलट सुलट चर्चांना उधाण आले आहे.

# दिल्लीत शाळकरी मुलीवर ॲसिड हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** राजधानी दिल्लीमध्ये ॲसिड हल्ल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. येथील एका १७ वर्षीय शाळकरी मुलीवर दिवसाढवळ्या ॲसिड हल्ला करण्यात आला. द्वारका परिसरामध्ये घडलेला हा संपूर्ण घटनाक्रम सीसीटीव्हीमध्ये कैद झाला आहे. पीडित मुलगी रस्त्याच्या कडेने चालत असताना समोरुन एका दुचाकीवर दोनजण आले. त्यांनी या मुलीजवळ आल्यावर गाडीचा वेग कमी केला आणि त्याचवेळी मागे बसलेल्या व्यक्तीने या मुलीवर ॲसिड फेकलं. अगदी क्षणार्धात हा सारा प्रकार घडला. आरोपींनी घटनास्थळावरुन पळ काढल्याचंही या व्हिडीओमध्ये दिसत आहे.



अचानक झालेल्या या हल्ल्यानंतर मुलगी आपल्या चेहऱ्यावर हात ठेवून पळताना दिसत आहे. मुलीच्या वडिलांनी पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, मुलीची प्रकृती गंभीर असून तिचा सर्व चेहरा भाजला आहे. तिच्या डोळ्यातही ॲसिड गेलं आहे. मुलीने दोन आरोपींची ओळख पटवली असून, एकाला ताब्यात घेण्यात आले आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. माझ्या दोन्ही मुली सकाळी एकत्र घराबाहेर पडल्या होत्या. यावेळी अचानक दुचाकीवरुन आलेल्या दोघांनी मोठ्या मुलीवर ॲसिड फेकले, अशी माहिती मुलीच्या वडिलांनी दिली आहे. या हल्ल्याचं सीसीटीव्ही फुटेज महत्त्वाचा पुरावा आहे. मुलीने कोणी त्रास देत असल्याची तक्रार केली होती का? असे विचारण्यात आले असता वडील म्हणाले नाही, तिने अशी कोणतीही तक्रार केली नव्हती. ती कुठेही गेली तरी मी सोबत असायचो. दोघीही शाळेत जाताना मेट्रोने एकत्र प्रवास करायच्या.

# पीकविम्यासाठी लातूरमध्ये मनसेचा सिनेस्टाईल राडा

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** नैसर्गिक संकटांमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मात्र पीक विमा कंपनीने अत्यंत कमी नुकसान दाखवून काही शेतकऱ्यांचे तर शुन्य नुकसान दाखवून नफेखोरी केली आहे. त्याचा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फटका बसला आहे. मनसैनिकांनी शेतकऱ्यांची परिस्थिती पाहता कार्यालयात जाऊन थेट जाब विचारला असता कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. अधिकाऱ्यांची भूमिका पाहून मनसेने संताप व्यक्त करत कार्यालयात राडा केला. मनसेच्या वतीने पीक विमा कंपनीच्या कार्यालयाची तोडफोड करण्यात आली. कार्यालयातील खुर्च्यांची मोठ्या प्रमाणात तोडफोड करण्यात आली. टेबलावरील काचा फोडण्यात आल्या. यावेळी मनसे शेतकरी सेनेचे प्रदेशाध्यक्ष संतोष नागरगोजे, मनसेचे जिल्हाध्यक्ष संजय राठोड, मनसे वाहतूक सेनेचे जिल्हाध्यक्ष वहीद शेख, रामदास पाटील व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# गारा, वाऱ्यासह अवकाळी पावसाचा दणका; पिकांचे नुकसान

## नागरिकांची तारांबळ; द्राक्षबागांसाह शेतमालावर विपरीत परिणाम

आधुनिक केसरी न्यूज


नाशिक : राज्यातील अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. या अवकाळी पावसाचा सर्वात जास्त फटका शेतकऱ्यांना बसला आहे. प्रामुख्याने धुळे, नाशिक जिल्ह्यात पडलेल्या अवकाळी पावसाने रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले. धुळे -शिरपूर इतरही अनेक भागांमध्ये गारांचा पाऊस पडला. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता अधिक वाढली आहे.

नाशिक जिल्ह्यात अनेक भागात ढगाळ वातावरण आणि पावसाची हजेरी सुरू आहे. बुधवार साडे चार वाजेच्या सुमारास नाशिक शहरासह जिल्ह्यातील काही भागात बेमोसमी पावसाने हजेरी लावली. नाशिक शहरासह त्र्यंबकेश्वर, गिरणारे आदी भागात जोरदार पाऊस झाला. बेमोसमी पावसामुळे रब्बी पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे.

नैऋत्य बंगालच्या उपसागरावर चक्रीवादळ तयार झाल्याने मध्यम ते हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली होती. त्यानुसार नाशिक शहरातील नाशिकरोड, सिडको, मखमलाबाद, गंगापूर रोड आदी परिसरात बेमोसमी पावसाने हजारी लावली. त्याचबरोबर जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर, गिरणारेसह हरसूल भागात देखील बेमोसमी पावसाचे आगमन झाले. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. तर दुसरीकडे गिरणारे आणि त्र्यंबक परिसरात जोरदार पाऊस सुरु असल्याने रब्बी पिकांची नासाडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी पुरता धास्तावला आहे.

नाशिकमध्ये आज सकाळपासून हवामानात बदल जाणवत होता. ढगाळ हवामानासह हवेत गारवा जाणवत असल्याने पावसाची शक्यता होती. अखेर साडे चार वाजेच्या सुमारास नाशिक शहरात अवकाळी पावसाने हजेरी लावली. अचानक आल्याने पाऊस सुरु झाल्याने नाशिककरांची तारांबळ उडाल्याचे पाहायला मिळाले. त्याचबरोबर नाशिकसह जिल्ह्यात अनेक भागात गेल्या तीन चार दिवसांपासून ढगाळ वातावरणामुळे अगोदरच द्राक्षबागांसह शेतमालावर विपरीत परिणाम होत असतानाच, आज दुपारी जोरदार पावसाने हजेरी लावली. कालही मनमाड, कळवण या तालुक्यात पावसाने हजेरी लावली. येवल्यातही ढगाळ वातावरण असल्याने सूर्यदर्शन नाही. त्यामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. कांदा पिकांवरही करपा रोग पडु लागला आहे. गेल्याच महिन्यात बेमोसमी पाऊस आणि खराब वातावरणामुळे द्राक्ष, भाजीपाला वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना महागड्या औषधांची फवारणी करावी लागली होती.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# फक्त आणि फक्त कृतज्ञता

आधुनिक केसरी



आपण बसतो कसे, उभे कसे राहतो, चालतो कसे या सर्व गोष्टींचे काळजीपूर्वक निरीक्षण केले पाहिजे. तर त्यात आपल्याला सुधारणा करता येईल. यासाठी प्रसंगी आरशात पाहून आपण आपल्या देहबोलीचा, बोलण्याचा सराव केला पाहिजे. यासाठी थोडे कष्ट जरूर पडतील. पण प्रत्येक चांगली गोष्ट अंगी बाणवण्यासाठी कष्ट घ्यावेच लागतात. सुरवंटाचे जेव्हा फुलपाखरू होते तेव्हा त्याला सुद्धा दिव्यातून जावेच लागते. आपल्या अनुकूल देहबोलीने एकंदर आपल्या जीवनात फरक पडणार असेल, तर आपण त्यात सुधारणा का करू नये ? दर दहा कोसांवर भाषा बदलते. भाषा जरी तीच असली तरी भाषेचा लहेजा बदलतो. त्याचप्रमाणे देहबोली सुद्धा विविध घटकांप्रमाणे बदलते. हे सुद्धा लक्षात ठेवणे आवश्यक आहे. आपल्या भारतीय संस्कृतीत कोणी भेटले की आपण हात जोडून नमस्कार करतो. पाश्चात्य संस्कृतीत सर्रास हस्तांदोलन केले जाते. काही अगदी पुढारलेल्या देशात व लोकांत हाताचे किंवा गालाचे चुंबन घेतले जाते. आपल्याकडे ही गोष्ट असभ्य मानली जाईल. म्हणून देहबोली सगळीकडे सारखीच असेल असे नाही. पण काही गोष्टी मात्र सगळीकडे सारख्या असतात. आपले चालणे, बसणे, उभे राहणे, चेहऱ्यावरील हावभाव इ. या सोबतच हे ही लक्षात ठेवले पाहिजे की परिस्थिती, व्यक्तीचे लिंग, वय, शरीराची ठेवण, वर्ण, वजन, उंची, बांधा आदी शारीरिक बाबींचा सुद्धा देहबोलीवर प्रभाव पडतो. त्याचबरोबर तुमचा लुक कसा आहे, केसांची ठेवण, दातांची तसेच एकूणच शरीराची स्वच्छता, तुम्ही वापरत असलेला पोशाख आदी बाबी पण तुमचे व्यक्तिमत्व खुलवण्यासाठी मदत करतात. आपल्या व्यक्तिमत्वाला साजेशी हेअरस्टाईल, साजेसा पोशाख यामुळे आपल्या व्यक्तिमत्वाला उठाव येण्यास मदत होते. कधी कधी भडक मेकअप मुळे काही स्त्रियांचे व्यक्तिमत्व खुलून दिसण्याऐवजी वाईट दिसते. म्हणून आपल्याला काय शोभून दिसेल याचेही भान आपण ठेवले पाहिजे. **क्रमशः**



## आनंदी पहाट

# आपले सामाजिक स्थान महत्वाचे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आजच्या गतिमान, आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात अन्न, वस्त्र, निवारा ह्या किमान प्राथमिक गरजांचा विचार करून फक्त चालत नाही, तर बदलत चाललेल्या जीवनमुल्यांचाही स्विकार करावा लागतो. आज आपल्या आयुष्यातील प्रत्येक सुखात आणि दुःखात आपल्याला शारीरिकदृष्ट्या साथ-सोबत करणारे, मानसिक आधार देणारे, अंतर्मनाला धीर देणारे, आर्थिकदृष्ट्या सक्षमता देऊ करणारे, सामजिक पत निर्माण करणारे, शैक्षणिक प्रगतीची दिशा दाखवणारे, सामाजिक कौटुंबिक एकोपा टिकवणारे, आपली नातीगोती जपणारे, उणीवा दूर करणारे, आपल्या जाणीवा जपणारे, आपल्या जाणीवांना नेणीवेपर्यंत घेवून जाणारे, आपल्या जीवनात अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारे आपले हक्काचे साधन हे दुसरे-तिसरे कोणतेही नसून ते म्हणजे आपल्या सामाजिक बांधिलकीचे नाते असते. आपल्या सर्वांच्या जीवनात अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा विषय म्हणजे आपले सामाजिक स्थान. ह्या सामाजिक स्थानाचा संबंध थेट आपल्या सामाजिक बांधिलकीशी असतो. एक प्रकारे आपल्या बांधिलकीमुळे सामाजिक कुटुंबाचीच, नवीन नात्यांचीच निर्मिती होत असते. त्या दृष्टीकोनातून सामाजिक बांधिलकीचे महत्व सामाजिक कुटुंबासाठी समजून घेणे जरुरीचे असते. आपले म्हणून ज्यावेळी आपण एखाद्या व्यक्तीचा अथवा गोष्टीचा मनापासून स्वीकार करतो तेव्हाच त्यांमधील आपला सहभाग वाढत जातो. तुझे-माझे करण्याच्या विचारांमुळे असणारा सहभाग केवळ माझ्या स्वतःशी संबंधित गोष्टींशीच राहतो. आपण सहजीवनाचा एकदा स्वीकार केला तरीही, आपण उगाचच असे करत राहतो. अनेकदा घडणाऱ्या काही घटना, घडामोडी ह्या निसर्गनियमांमुळे सुरु असल्यासारखे वाटते. कदाचित सहभागाचा अभाव असल्याचे ते महत्वाचे कारण असावे. सहभागाचा आनंद हा केवळ त्याची प्रचीती आल्याशिवाय देखील मिळत असतो.



आधुनिक केसरी

## पावलो विसावा | तुझ्या कृपे ||

जीवाचे ह्या हाल | झाले रात्रंदिन ||
तुझेच चिंतन | मन करी ||१||
संसाराचे सुख | नाथाने दावीले ||
जगणेच झाले | दिव्य लेणे ||२||
व्यसनाचा संग | कधी न जडला ||
म्हणूनी भेटला | ज्ञानदेव ||३|
तृप्त झालो आज | भजनात तुझ्या ||
अंतरात माझ्या | तुकाराम ||४||
मागणे न आता | नाही तुज देवा ||
पावलो विसावा | तुझ्या कृपे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरूपण"

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## भक्ती

**सुवर्णवृष्टिकारिके सुवर्णवर्णधारिणि । तमो नाशय नाशय जगत्प्रकाशिके शिवे ।।३।। हे सुवर्णवर्ण असणारे, सुवर्णवृष्टी करणारे, जगत्प्रकाशिके, शिवे, अंधार नष्ट कर. अर्थात सर्व काही कल्याणप्रद कर.**

# काव्य-चरितावली

## पुष्प -५ वे



आधुनिक केसरी

श्रीमहाराजांच्या बाललीला पाहुनी
रावजी -गीतामाय आनंदती मनोमनी
मित्र जमवूनी महाराज खेळात रंगती
पंतआजोबा हे सारे आनंदाने पाहती ।।

मुंजसंस्कार-कार्य श्रीमहाराजांचे झाले
ब्रह्मकर्म शिकविण्यास कुलगुरू आले
वृत्तीत बदल होण्यास सुरुवात झाली
मनात चिंतनाची चाहूल लागू लागली ।।

सातव्या वर्षी त्यांना शाळेत घातले
सुंदर वळणदार अक्षरे त्यांनी गिरविले
गुरूंनी जे जे त्यांना शिकवले ,ते सारे
महाराजांनी सत्वर आत्मसात केले ।।


श्रीराम समर्थ "कित्ता महाराज गिरविती
मुले सहजतेने श्रीराम समर्थ गिरविती
कवी अरुणदास म्हणे गुरुकृपा झाली
मजही येते आहे अशीच हो अनुभूती ।।



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# उत्कट भावनेने भगवंताची उपासना करावी

आधुनिक केसरी



विस्तव माहीत नसला, तरी तो हाताला चुकूनही लागला तरी हात भाजतो; किंवा हा परीस आहे हे माहीत नसूनही, लोखंडाचा घण त्यावर मारला तरी त्याचे सोने व्हायचे रहात नाही. त्याप्रमाणे ज्ञानाशिवाय नुसते भक्तीने जरी भगवंताकडे गेले तरी काम होते. परंतु दुसऱ्या विषयांची आसक्ति जोवर आपल्याला सुटत नाही, तोवर मनापासून भगवद्भक्ति होत नाही. जिथे उत्कट भावना आहे तिथे सगुण मूर्तीला मनुष्यधर्म प्राप्त होतील. उपासक देहाला विसरला की उपास्यमूर्तीमध्ये त्याला जिवंतपणा अनुभवाला येऊ लागेल. शिवाय, जे इतर लोक थोडे तन्मय झाले आहेत, त्यांनादेखील तो अनुभवाला येईल. परंतु उपासकाची किंवा भक्ताची भावना नेहमी उत्कट राहीलच असा नेम नाही. म्हणून अशा उपासकाला मूर्तीमधल्या चैतन्याचा अनुभव येऊन देखील पारमार्थिकदृष्ट्या फायदा होईलच असे निश्चित नाही.

एका मुलाने काही खोडी केली म्हणून शेजारच्या बाईने त्याला एक चापट मारली. त्याबरोबर त्या मुलाने मोठे भोकाड पसरले आणि त्या बाईला शिव्या देऊ लागला. ते ऐकून त्याची आई बाहेर आली आणि तिने त्याला चांगलाच झोडपला. परंतु आईच्या हातचा इतका मार खाऊनसुद्धा तो मुलगा फार ओरडला नाही, आणि त्याने आईला उलट शिव्यापण दिल्या नाहीत. हे जसे खरे, त्याप्रमाणे आपल्यावर येणारी संकटे ही भगवंताने आणली आहेत अशी निष्ठा असेल, तर आपल्याला त्यांचा त्रास होईल, पण त्यांनी आपली शांति बिघडणार नाही. भगवंताचा विसर आपल्याला पडला की आपली शांति बिघडते. ज्या दातांनी सिंह मोठाले प्राणी मारतो त्याच दातांनी तो आपल्या पिल्लांना इजा न करता उचलतो, हे लक्षात असू द्यावे. आपण निःपक्षपाती बुद्धीने विचार केला तर भगवंताचे सान्निध्य लाभले त्यालाच निर्भयता आणि निर्वासनता येईल. प्रत्येक माणसाला आधार लागतो. पण आपण अपूर्णाचा आधार धरल्यामुळे आपल्याला निर्भयता येत नाही; यासाठी भगवंताचा आधार धरावा. बुद्धीने निश्चय करावा आणि मन भगवंताकडे लावावे, की इंद्रिये तिकडे बळजबरीने जातीलच, राम उपाधिरहित आणि त्याचे नामही उपाधिरहित आहे. म्हणून, ज्याप्रमाणे खडक किंवा वाळू पाण्याशी मिसळत नाहीत, साखर किंवा मीठच विरघळते आणि समरस होते, तद्वत् रामाशी त्याचे नामच समरस होते.

**आजचे बोधवचन आहे** – सर्व सृष्टी रामरूप दिसणे हेच भक्तीचे फळ आहे.

# आवळा पावडरचे आश्चर्यकारक फायदे

आधुनिक केसरी

छातीत जळजळ आणि असिडीटीचा त्रास अनेकांना होत असतो. असिडीटी झाल्यावर लोक गोळ्या खातात. गोळ्या खाल्ल्यानंतर काही वेळ असिडीटीचा त्रास कमी होतो. पण नंतर पुन्हा त्रास जाणवतो. त्यामुळे जर तुम्हाला पित्ताचा त्रास कमी करायचा असेल तर तुम्ही आवळा पावडर घातलेले पाणी पिऊ शकता. आवळ्यामध्ये एथेनॉलिक नावाचे तत्व आढळते. यामध्ये चरबी कमी करणारे आणि अँटिऑक्सिडंट्स गुण आढळतात. यामुळे आवळ्याच्या पावडरच्या सेवनाने तुमचे वजन वाढत असेल तर ते नियंत्रणात येण्यास मदत मिळते. तसंच अतिरिक्त चरबी आवळा शरीरामध्ये जमू देत नाही. चयापचयाची क्रिया तुम्हाला व्यवस्थित करण्यासाठी आवळा पावडरचा उपयोग होतो. तुम्ही नियमित कोमट पाण्यातून आवळा पावडर मिक्स करून प्यायल्यास तुमचा पचनक्रियेचा त्रास नक्कीच दूर होतो. तसंच वजनही नियंत्रणात राहते. आवळ्याला एक आदर्श फळच म्हटले जाते. कारण यामध्ये अनेक गुण असून शरीरासाठी याचे अनेक फायदे होतात. सर्वात महत्त्वाचा फायदा म्हणजे पचनक्रिया उत्तम होते. पचनक्रिया उत्तम झाली तर आपोआपच वजन कमी होण्यास सुरूवात होते. वास्तविक फायबरचे प्रमाण चांगले असल्यामुळे त्रास कमी होतो.

# 'हरियाली'चे पाणी गावात नव्हे तर कर्मचाऱ्यांच्या खिशात मुरले

## गावातील रहिवासी दर्शवून उचलला निधी




**२ कोटी यांच्या खात्यात**

आधुनिक केसरीने अधिक माहिती घेतली असता याची व्याप्ती मोठ्याप्रमाणात समोर आली. ९ गावांमध्ये काम झालेल्या अध्यक्ष व सचिव हे बाहेर गावातील आहेत. प्राप्त माहितीनुसार काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा यात मोठ्या प्रमाणात समावेश आहे. त्यांच्या खात्यात योजनेचा सुमारे २ कोटींहून अधिक निधी वर्ग करण्यात आला आहे. विशेष म्हणजे यातील बहुतेक कर्मचाऱ्यांचे खाते औरंगाबाद येथील एस.बी.एच, बँक, रेल्वेस्टेशन व मोंढानाका येथील सेंट्रल बँक येथील आहेत. त्यामुळे आता भ्रष्टाचारात बँकेचे अधिकारी आहेत की काय? असा संशय बळावत आहे.

आधुनिक केसरी न्यूज


**देशभरातील दुष्काळग्रस्त गावांमध्ये पाणीटंचाई दुर करून गावे समृध्द करण्यासाठी केंद्र पुरस्कृत अवर्षण प्रणव क्षेत्र कार्यक्रम हाती घेण्यात आला. यानुसार प्रत्येक राज्यातील पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत हा उपक्रम औरंगाबाद जिल्ह्यात 'हरियाली' या नावाने राबवण्यात आला. दिलासा जनविकास प्रतिष्ठान या अशासकीय एनजीओमार्फत अनेक गावांत कामे हाती घेण्यात आली. मात्र या संपूर्ण कामात अनियमितता करून गावकाऱ्यांच्या निधीवर कर्मचाऱ्यांनी डल्ला मारला. शासनाचे नियम धाब्यावर बसवून कर्मचाऱ्यांनी अधिकाऱ्यांना हाताशी धरुन कसा डल्ला मारल्याचे माहिती अधिकारात समोर आले आहे.**


### थेट प्रश्न





संजीव उन्हाळे
संचालक दिलासा जन विकास प्रतिष्ठान

- **संस्थेच्या माध्यमातून हरियाली योजनेचे काम झाले आहे का?**
  संस्थेमार्फत हरियालीची कामे करण्यात आलेली नाहीत.
- **योजनेअंतर्गत आपले कर्मचारी, अध्यक्ष, सचिव आहेत?**
  होय, गावातील निधीचा योग्य वापर व्हावा म्हणून संस्थेचा कर्मचाऱ्यांचा त्यात सहभाग असतो.
- **परंतु हे अध्यक्ष सचिव त्या गावचे रहिवाशीच नाही, असे ग्रामपंचायतीचे म्हणणे आहे?**
  तशी आवश्यकता नाही.









1) अध्यक्ष व सचिव गावातील रहिवासी नसल्याचे ग्रामपंचायतीचे पत्र.

2) विकास कार्यक्रम हरियाली यातील अध्यक्ष व सचिव असलेले पत्र.

**कामाचे सर्वाधिकार ग्रामस्थांना..** केंद्र पुरस्कृत अवर्षण क्षेत्र कार्यक्रम व एकात्मिक पडीक जमीन विकास कार्यक्रमांतर्गत पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राज्य शासनामार्फत औरंगाबादेत राबविण्यात आला. गावातील कामे हाती घेण्यासाठी सर्वाधिकार गावातील स्थानिक रहिवाशांच्या पाणलोट समित्यांना देण्यात आली. समित्यांवर कोणताही शासकीय कर्मचारी अध्यक्ष व सचिव राहता कामा नये, असा नियम देखील यात स्पष्ट करण्यात आला होता. कामावर होणारा खर्च थेट अध्यक्ष व सचिव यांच्या संयुक्त खात्यात जमा केला जात होता. ही जबाबदारी दिलासा जन प्रतिष्ठान या अशासकीय एनजीओला देण्यात आली. या सर्व कामाच्या निधी वाटप व नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी स्थानिक जिल्हा ग्राम विकास यंत्रणांना देण्यात आली.

**असा मारला निधीवर उल्ला...** पाणलोट समितीवर गावातील रहिवाशी अध्यक्ष व सचिव असावा, असा नियम आहे. कारण त्यांच्या संयुक्त बँक खात्यामध्ये कामाचा निधी देण्यात येतो. मात्र गावातील तयार करण्यात आलेल्या समित्यांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी घुसखोरी केली. खोटी कागदपत्रे सादर करून गावातील रहिवासी दाखवून समितीच्या अध्यक्ष व सचिव पदावर वर्णी लावून सर्व निधी परस्पर हडपला. फुलंब्री व कन्नड तालुक्यातील ९ गावांची कामे दिलासा जन विकास प्रतिष्ठान संस्थेमार्फत करण्यात आली. यात माळेगाव ठोकळ १ व २, हिवरा १ व २, नायगाव, सेनारी, गौरपिंप्री, पाडळी, वावना यांचा समावेश होता. कामे झालेल्या गावातील समितीचे अध्यक्ष व सचिव यांच्या मार्फत निधीचे वाटप झाले. या योजनेत घोटाळा झाल्याचे ग्रामस्थांच्या लक्षात आले, तेव्हा जिल्हा ग्राम विकास संत्रणेकडे माहिती अधिकारात माहिती मागविण्यात आली. तेव्हा गावातील समितीवरील अध्यक्ष व सचिव हे त्या गावातील रहिवासी नसून ते संस्थेचे कर्मचारी असल्याचे समोर आले. त्यामुळे हरियाली योजनेचे पाणी गावात नव्हे तर कर्मचाऱ्यांच्या खिशात मुरल्याचे समोर आले.

**हे आहेत अध्यक्ष व सचिव...** आधुनिक केसरीने अध्यक्ष व सचिव यांचा शोध घेतला असता यात खुशाल दाभाडे, रवी बोराडे, विलास राठोड, निजाम शेख, नवनाथ दणके, जयश्री महाजन, देवचंद दुल्हत, विठ्ठल सुर्वडे, राजू जोगदंड यांच्यातील अनेकांची नावे समोर आली. यातील जयश्री महाजन या कन्नड तालुक्यातील सोनारी आणि ठोकळ या दोन ठिकाणच्या रहिवासी आहेत. राजु जोगदंड हा रामनगर, औरंगाबाद येथील रहिवासी असून तो पाडळी येथील समितीचा सचिव दाखवण्यात आला. तो गावातील रहिवासी नाही, हे ग्रामपंचयतीने लेखी माहिती अधिकारात दिले आहे. फुलंब्री तालुक्यातील वावना गावातील अध्यक्ष रवी बोराडे व सचिव साळवे हे गावातील रहिवासी नाहीत, असे ग्रामपंचायतीने लेखी दिले. विलास राठोड हा कन्नड तालुक्यातील ठोकळ गावच्या समितीचा सचिव आहे. मात्र तो प्रत्यक्षात उस्मानाबाद येथील रहिवासी आहे. गावातील रहिवासी नसताना अध्यक्ष व सचिव बनवून २ कोटी २ लाखांचा निधी त्यांच्या खात्यावर गेला आहे.

# शिक्षक, पालक व चिमुकल्यांची जीव मुठीत धरून शाळेत ये- जा





आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**उस्मानाबाद :** येथे असणाऱ्या नूतन प्राथमिक शाळे शेजारूनच उच्च दाबाची विद्युत वाहिनी गेले आहे. सदरील विद्युत वाहिन्यांचे लोखंडी पोल नालीतील पाण्याने गंजून गंजून मोडकळीस आलेले आहेत. त्यामुळे हे कधीही मोडून खाली पडू शकतात. त्यामुळे या वरदळीच्या रस्त्याने ये जा करणारे नागरिक विद्यार्थी त्याचबरोबर या शाळेमध्ये दररोज पाच हजाराच्या वर विद्यार्थी त्यांचे पालक व शिक्षक हेही जीव मुठीत धरून शाळेत ये जा करत आहेत. वारंवार संबंधित विभागाला लेखी पत्र देऊन तर कधी तोंडी सांगून याबावत माहिती दिली आहे. तरीही अधिकारी व कर्मचाऱ्याकडून या बाबीकडे जाणिवपूर्वकच दुर्लक्ष होत आहे. मोडकळीस आलेले उच्च दाबाच्या वाहिनीचे जीर्ण झालेले लोखंडी पोल लवकरात लवकर बदलून भविष्यात होणारी दुर्घटना टाळावी हीच मागणी पालक व शिक्षक वर्गामधून होत आहे.

> वारंवार पत्रव्यवहार करूनही महावितरण करून कुठलेच ठोस पावले उचलले जात नाहीयेत. म्हणुन जिल्हाधिकारी कार्यालय सुद्धा याबाबत पत्र पाठवले आहे, तरीही महावितरण करून संबंधित धोकादायक पोल काढण्यात आलेले नाहीत.
> गोरे सर, मुख्याध्यापक नूतन प्राथमिक विद्या मंदिर, उस्मानाबाद



# सैन्यसंघर्षावरून वादंग

आधुनिक केसरी

अरुणाचल प्रदेशमधील तवांग सेक्टरच्या यांग्त्से परिसरात प्रत्यक्ष ताबारेषेचे उल्लंघन करून घुसखोरीचा चिनी सैनिकांचा प्रयत्न भारताच्या शूर जवानांनी फोल ठरवला. या चकमकीमध्ये दोन्हीकडील सैनिक किरकोळ जखमी झाले. प्राणहानी झालेली नसून, एकही जवान गंभीर जखमी झालेला नाही," असे स्पष्टीकरण संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी मंगळवारी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये दिले. मात्र, चिनी घुसखोरीच्या मुद्द्यावर सभागृहात चर्चेची मागणी विरोधकांनी लावून धरली. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि राज्यसभेचे उपसभापती हरिवंश यांनी चर्चेला अनुमती न दिल्यामुळे दोन्ही सभागृहांतील विरोधकांनी सभात्याग केला. दोन वर्षांपूर्वी लडाखमध्ये घुसखोरी करण्याचा प्रयत्न हाणून पाडल्यानंतरही, ९ डिसेंबर रोजी अरुणाचल प्रदेशमधील तवांग परिसरात चिनी सैनिकांनी पुन्हा भारताची कुरापत काढली. प्रत्यक्ष ताबारेषा ओलांडून आलेल्या चिनी सैनिकांना भारतीय जवानांनी चोख प्रत्युत्तर दिले. ईशान्येकडील भागांमध्ये, प्रामुख्याने लडाख आणि अरुणाचल प्रदेशमध्ये चीनच्या आक्रमक भूमिकेवरून विरोधकांनी मंगळवारी केंद्र सरकारला जाब विचारला. चीनबाबत केंद्र सरकार मवाळ भूमिका घेतल्याचा आरोप विरोधकांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांत येऊन निवेदन देण्याची मागणी काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांनी केली. मंगळवारी राजनाथ सिंह यांनी संरक्षण दलाच्या तीनही प्रमुखांच्या बैठकीनंतर लोकसभेत दुपारी बारा वाजता व राज्यसभेत साडेबारा वाजता एक पानी लिखित निवेदन वाचून दाखवले. 'घटनेनंतर ११ डिसेंबर रोजी तिथे तैनात असलेल्या भारत व चीनच्या लष्करी अधिकाऱ्यांनी ध्वजबैठक घेऊन चर्चा केली. घुसखोरी न करण्याचा तसेच, तवांगच्या प्रत्यक्ष ताबारेषेवर शांतता राखण्याचा इशारा चीनला देण्यात आला आहे. तसेच, या घटनेची गंभीर दखल घेत भारताने राजनैतिक स्तरावरही नाराजी व्यक्त केली आहे,' असे राजनाथ सिंह यांनी सांगितले. राजनाथ सिंह यांचे निवेदन अत्यंत त्रोटक असल्याने ते पाच मिनिटांमध्ये वाचून संपले. त्यामुळे राज्यसभेत काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, शिवसेना, द्रमुक, राष्ट्रीय जनता दल, माकप-भाकपसह अन्य विरोधी पक्षांचे सदस्य आक्रमक झाले. चिनी घुसखोरीचा मुद्दा अत्यंत गंभीर असल्याने या विषयावर सभागृहामध्ये चर्चा झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. त्यावर हरिवंश यांनी, नक्षलवादी व दहशतवादी हल्ल्यांच्या घटनांनंतरही सभागृहांमध्ये चर्चा केली गेली नसल्याचे सांगत ही मागणी फेटाळली. काँग्रेस, शिवसेना, तृणमूल काँग्रेससह विरोधी पक्षांनी दोन्ही सभागृहांमध्ये स्थगन प्रस्तावाच्या नोटिसा दिल्या होत्या. लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास व राज्यसभेत शून्य प्रहरात विरोधी पक्षांनी तवांगमधील चिनी घुसखोरीचा मुद्दा उपस्थित केला. दोन्ही सभागृहांमध्ये काँग्रेसचे सदस्य अध्यक्षांसमोरील हौदात येऊन घोषणाबाजी करत होते. त्यामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाज तहकूब करण्यात आले. राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनीही उपसभापतींकडे मुद्दा मांडण्याची अनुमती मागितली होती. राजनाथ सिंह यांच्या निवेदनानंतरही खरगे यांनी, या घटनेसंदर्भात चार प्रश्न केंद्र सरकारला विचारायचे आहेत, असे सांगितले. विरोधकांना बोलू न देण्याची 'प्रथा' योग्य नसल्याचे राष्ट्रीय जनता दलाचे मनोज झा आक्रमकपणे मांडत होते. पण उपसभापतींनी बोलू न दिल्याने काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांच्या सदस्यांना सभात्याग केला.

# काँग्रेसमध्ये हिंदु व राष्ट्र विरोधकांची घुसखोरी?

आधुनिक केसरी



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

**देशात स्वत: धर्मनिरपेक्ष म्हणजे हिंदुवर टिका करणे व्देष समजत जात आहे. "काँग्रेस सर्व धर्मांचा आदर करणारा पक्ष आहे. पण पक्षातील ही काही नेते हिंदू व्देषाच्या विचाराकडे नेत आहेत.त्यामुळे काँग्रेसवर हिंदु विरोधी ठपका बसला आहे. तेव्हा काँग्रेस नेतृत्वाला याबाबत आत्मचिंतन करण्याची गरज आहे. नेते राहुल गांधी यांच्या भारत जोडो पदयात्रेत तर राष्ट्रविरोधी शक्ती सहभागी होत आहेत.देशात हिंदु द्वेषाचे राजकारण असेच चालू राहिले तर २०२४ काय? २०२९ पर्यत भाजापाचे सक्षम नेतृत्व असलेल्या मोदींना पराभव करणे अशक्य आहे" हे माझे म्हणणे नाही, हे काँग्रेस राष्ट्रीय प्रवक्ते आचार्य प्रमोद कृष्णन म्हणणे आहे. दोन राज्यातील विधानसभेच्या निवडणूक विश्लेषणावर वृत्त वाहिनीवर चर्चावेळी त्यांनी पक्षाला स्पष्टपणे 'घरचा आहेर' दिलेला आहे.**

आचार्यजी काँग्रेसची समर्थनपणे, संशमपणे, अभ्यासपूर्ण बाजू मांडणारे चांगले प्रवक्ते म्हणून त्यांचे नाव घेतल जाते.ते श्रीमती प्रियंका वाड्रा यांचे समर्थक मानले जातात. आचार्यांच्या मतावर काँग्रेस नेतृत्व गंभीरपणे विचार करेल वाटत नाही. यावरून काँग्रेसच्या हिंदू विरोधी भूमिकेमुळे काही नेते नाराज आहेत, हे दिसत आहे. आचार्य यांच्या मताशी गांधी समर्थक सहमती दर्शविणार नाहीत, उलट गांधी परिवारांचे अंधभक्त नेते आचार्य यांचेवर पक्षशिस्तीची कारवाईची मागणी करतील. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा दारूण पराभव झाला. तेंव्हा पक्षाने पराभवाचे कारणे शोधण्यासाठी पक्षाचे ज्येष्ठ नेते 'अँटोनी' यांची समिती नियुक्त केली होती. तेंव्हा त्यांनी काँग्रेसच्या सतत हिंदु विरोधी भूमिकेमुळे पक्षाचा पराभव झाला, असे म्हटले होते. पण गांधी परिवाराने त्यांच्या समितीचे मताला किंमत दिली नाही.उलट नेते राहूल गांधी हे हिंदुंच्या विरोधात आक्रमकपणे बोलत राहिले. २०१९ पुन्हा मोदी व भाजापा सर्वाधिक जागा जिंकून सत्तेत आला. काँग्रेस पक्षाला असे काय झाले? स्वातंत्र्याआधी व नंतर काँग्रेसमध्ये नेते ब्राह्मण व बहुजनसमाजातील नेते होते. देशात गाव पातळीवर उघडपणे व वाजत गाजत काँग्रेसला मतदान केले जात असे,तेंव्हा विरोधी पक्षाला स्थान नव्हते. श्रीमती इदिरा गांधी १९६६ मध्ये सत्तेत आल्यानंतर पक्षात गटबाजी, एकाधिकारशाही, भ्रष्टाचार प्रोत्साहन मिळाले. काँग्रेस पक्षाचे दोन वेळेस विभाजन झाले. गांधी परिवाराने पक्षाचे नेतृत्व आपल्याकडे असे यासाठी स्वतः चा दवाब गट निर्माण केला. गांधी परिवाराची हुजरेगिरी करणाऱ्या नेत्यांची संख्या वाढली. तोच वारसा सोनिया व राहूल गांधी चालवत आहेत. काँग्रेस पक्षाची हिंदु विरोधी मानसिकता ही देशाच्या विभाजनापासून आहे.काँग्रेसने धर्माच्या आधारावर देशाच्या विभाजनाला मान्यता दिली. यातून मुस्लिमांसाठी स्वंतंत्र पाकिस्तान राष्ट्र निर्माण दिले गेले.मग हिंदुसाठी हिंदूस्थान का नाही? संविधान सभेत देशाचे काय नाव असे असावे? यावर बराच खल झाला. शेवटी १८ सप्टेंबर १९४९ मध्ये संविधानाच्या अनुच्छेद -१ मध्ये INDIA TAAT A BHARAT SHALL BE UNION STATAS. असा उल्लेख केला गेला.स्वातंत्र्यानंतर १९५२ मध्ये हिंदुचे श्रध्दास्थान बारा ज्यातिर्लिंगापैकी सोमनाम मदिंराच्या जीर्णाव्दाराचा निर्णय स. वल्लभाई पटेल व कन्हैलाल मुन्सी यांनी घेतला होता.त्यास तत्कालिन पंतप्रधान नेहरू यांचा विरोध होता.हिदु धर्माचे व भावनांचे पुनरूज्जीवन ठरू शकणाऱ्या सोमनाथ मंदिर जिर्णाव्दाराची योजना नेहरूंना मान्य नव्हती.यामुळे धर्मनिरपेक्षतेला धक्का बसेल लागेल,असे म्हंटले गेले. १९४८ मध्ये गांधी हत्येनंतर काँग्रेसने ब्राह्मण हत्याकांड घडविले गेले.१९६६ मध्ये गोहत्याबंदीची मागणी करणाऱ्या हिंदु संतावर गोळ्या झाडल्या गेल्या.नंतर १९८४ मध्ये दिल्लीत शीखांचे हत्याकांड घडविले गेले.आयोध्यात १९९० रामभक्तावर निर्घृणपणे गोळ्या झाडल्या गेल्या.या सर्व घटनांची काँग्रेस पक्षाला कधी खंत ना दुःख वाटते.पण गुजरात २००२ मध्ये झालेल्या दंगलीची एकाच बाजू घेवून मोदी व भाजपा टार्गेट केले गेले.देशात काँग्रेस राजवटीत अनेक दंगली झाल्याची नोंद आहे. गुजरातमध्ये पूर्वी दंगली झालेल्या आहेत.दंगल कोणतेही असो निंदनीय आहे,त्याचे समर्थन होऊ शकत नाही.यात दोन्ही बाजूच्या निष्पाप लोकांचा बळी जातो.पण काँग्रेसने मतासाठी गुजरात दंगलीचा वापर केला.हिंदू धर्मात पुरूषोत्तम प्रभू रामचंद्राचे आयोध्या हे जन्मस्थान व श्रध्दास्थान आहे.मोगल बादशहा बाबरने १५२८ मध्ये राम मंदिर उध्वस्त करून तेथे मस्जिद बांधली.इंग्रज राजवटीत या जागेवर अनेक घटना घडल्या. हिंदु बांधव सुमारे चारशे वर्षे राम मंदिर उभारणीचा संघर्ष करत राहिले.मुस्लिम राजांनी भारतातील सुमारे दोन लाखाच्यावर मंदिरे तोडली,उध्वस्त केली हा इतिहास आहे. त्यात काशी व मथुराच्या मंदिरात मस्जित उभारल्या गेल्या आहेत!तो वाद आजही चालू आहे.१९३५ मध्ये हिंदु धर्म सभेत केवळ हिंदुच्या तीन श्रध्दास्थानाचा दावा सोडवा, अशी मागणी केली,पण कट्टर मुस्लिम नेत्यांनी फेटाळली.काँग्रेसने तुष्टीकरणाच्या राजकारणातून शहाबानो प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचा निकाल डावलून मुस्लिम नेत्याच्या दबाबाखाली कायदा केला.यावरुन हिंदु समाजात मोठी नाराजी व टीका होऊ लागली.तेंव्हा तत्कालिन पंतप्रधान राजीव गांधी १९८९ यांनी हिंदुचे मत आकर्षित करण्यासाठी राम मंदिर उभारणी शिलान्यास परवानगी दिली होती.तेंव्हा विश्व हिंदू परिषदेचे सह सचिव व बिहारचे दलित नेते कामेश्वर चौपाल यांचे हस्ते पहिली वीट बसविण्यात आली.जनसंघ ते भाजपाने जाहीरनाम्यात आयोध्यात राम मंदिर उभारणीचा स्पष्ट उल्लेख केलेला होता.तेंव्हा काँग्रेसने 'मंदिर वही बंनायेंगे,लेकीन तारीख नही बतायेंगे' असे म्हणत भाजपाची थट्टा उडविली.राम मंदिर उभारणीत काँग्रेसने अडथळे आणले. काँग्रेसचे १९९१असा कायदा केला की, १९४७ मध्ये मस्जिदींची जी स्थिती होती ती बदलता येणार नाही? हा हिदुंच्या धर्माच्या अधिकारावर गदा आणणारा नाही काय? तत्कालीन पंतपंधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी जग्गनाथपूरी येथील मंदिरात प्रवेश नाकारला होता.कारण त्या पारशी आहेत.राहूल व प्रियंका यांना तेथे प्रवेश नाही.यातील हिंदु व्देषाचे हे एक कारण आहे.काँग्रेसने आयोध्या येथे प्रभू रावचद्रांची जन्मभूमी व त्या वादग्रस्त मानावयास तयार नव्हते, २००७ मध्ये काँग्रेसचे नेते कपील सिब्बल यांनी तर राम हे काल्पनिक आहे! असे सरकारतर्फे सर्वोच्च न्यायालयात शपथपत्र दाखल केले होते. पंतप्रधान मोदी यांचे हस्ते ५ऑगस्ट २०२० आयोध्यात राममंदिराची कोनशिला बसविली गेली.पण पंतप्रधानांनी मंदिराचे पूजन करणे योग्य नाही,मंदिराच्या कोनशिला कार्यक्रमाला स्थगिती मिळावी म्हणून काँग्रेस नेत्याने न्यायालयात याचिका दाखल केली होती.पं नेहरू यांनी रामायण हे काल्पानिक कथा असे म्हंटले होते.तसेच काँग्रेसचे नेते मणीशंकर अय्यर,शशी थरूर आदी आदी नेत्यांनी प्रभू रामांच्या अस्तित्वावर प्रश्न निर्माण केला होता.दुसरीकडे हिंदु मतासाठी मात्र राहूल गांधी प्रियंका वाड्रा हे निवडणुक काळातच मंदिर जातात.राहूलबाबांनी कोटावरून जाणवे घातले तसेच आपले गोत्र दत्तात्रेय असल्याचे सांगितले.त्यात आमचे हिंदुत्व वेगळे भाजपाचे हिदुत्व वेगळे सांगितले गेले.आता राहूबाबांनी महाराजांनी मध्यप्रदेश ३ डिसेंबर २ ०२२ रोजी भारत जोडो यात्रेत नवीन प्रवचन दिले.त्यांना कोण्या तरी पंडितांनी असे सांगितले म्हणे, भाजपा व आर,एस.एस.वाले 'जय श्रीराम' म्हणतात पण 'जय सीयाराम' म्हणत नाहीत.वास्तविक धर्मात दोन्ही नावाचा जयघोष केला जातोय! पण प्रभू रामांच्या पुढे 'श्री' लावले जाते,यात लक्ष्मी व सीता आहे, याचे गांधीबाबांना धार्मिक ज्ञान नाही.पण राहूल गांधीनी 'जय सीयाराम" जयघोष केला आहे!काँग्रेसचे सर्व नेते तोच जयघोष करणार ! हे चांगले झाले! सोनिया, राहूल गांधी !प्रियंका गांधी जे बोलतील व वागतील तेच काँग्रेस पक्षाचे धोरण व विचार मानण्याची पक्षात परंपरा सुरु आहे.पण २०२० मध्ये आयोध्यात भूमिपूजनच्यावेळी पंतप्रधान मोदी यांनी 'सियारामचंद्र की जय' अशा जयघोष केला होता,हे गांधींना कोणी सांगितले कसे नाही.अज्ञानी व्यक्ती आपण ज्ञानी असल्याचे भासवून लोकांची दिशाभूल करत असतत.पण काही असो गांधी परिवाराने प्रभू रामांचे अस्तित्व मान्य केले आहे.हे चांगले संकेत आहेत. घटनाकार डॉ. आंबडेकरांनी भारतातील कायदे हे धर्माच्या आधारावर असणार नाहीत, असे म्हंटले आहे.देशात हिंदु धर्मातील परंपरा,जाती भेद,रूढीच्या विरोधात कायदे आणले गेले. डॉ. आंबेडकरांमुळेआज हिंदुतील महिलांना पुरूषाप्रमाणे समान हक्क,अधिकार मिळाले,आहेत हे त्यांचे उपकार आहेत.पण काँग्रेस तीन तलाक, समान नागरी कायदा, लोकसंख्या नियंत्रण कायद्याचा विरोध का करतेय ? हे भारतीयांना समजतेय! भाजपा व मोदी म्हणजे हिंदु धर्म नव्हे,हिंदु धर्म धर्म विशाल आहे! ती एक भारतीय आदर्श संस्कृती आहे.याच हिंदु धर्माला काँग्रेसने अतिरेकी म्हंटले गेले,हिंदु धर्मात हिंसेला थारा नाही,तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर हिंदुची अतिरेकी संघटना नाही,फतवा काढला जात नाही. स्वातंत्र्यवीर सावरकर,स्वामी विवेकानंद व प्रबोधनकार ठाकरे, साने गुरूजी व अनेक संतानी हिंदु धर्मातील जाती,रूढी,परंपरावर प्रहार केले आहेत. काँग्रेस पक्षात बऱ्याच वर्षानंतर गाधी परिवाराबाहेरचा राष्ट्रीय अध्यक्ष खडगे यांची निवड झाली,पण पक्षावर गांधी खानदानचे नेतृत्व व वर्चस्व कायम आहे.परवा काँग्रेसने पक्षाची रणनीती ठरविण्यासाठी पक्षाची बैठक श्रीमती सोनिया गांधी यांच्या निवासस्थानी घेतली. हिमाचल प्रदेशचा मुख्यमंत्री निर्णय पक्षाचा नव्हे,श्रीमती सोनिया गांधी व प्रियंका वाड्रा यांनी घेतला आहे.म्हणजे अजून काँग्रेस गांधी कुटुंबाच्या घरी पाणी भरत आहे.देशात भाजपा मोदी हे व्देष कोण पसरवित आहे? हिंदु व मुस्लिम असा भेदभाव निर्माण करतोय! असा काँग्रेसचा नेहमीचा आरोप आहे. काँग्रेसची मतासाठी मुस्लिमांची तर भाजपा हिंदुची भूमिका घेत आहे. पण भाजपाने शासकीय धोरणात कधी मुस्लिमांचा भेदभाव करत नाही.गांधी परिवाराला हिंदु संघटना,पक्षाबद्दल मत्सर आहे. त्या हिंदू सघटना पक्षच नकोच आहेत! पण त्यांना इतर कट्टर धार्मिक संघटनाचा विरोध करत नाहीत.राष्ट्रविरोधी संघटना,धर्माच्या नावावर कायद्याला विरोध करणाऱ्या संघटना आणि काँग्रेस एकाच विचाराच्या दोन बाजू आहेत.काँग्रेसच्या एका नेत्याने पंतप्रधान मोदींना ठार मारण्याची वक्तव्य केले आहे. काँग्रेसने हिंदु विरोधी बी पेरले आहे. तेंव्हा त्या वृक्षाला विषारी फळे येणारच! धर्म कोणताही असो,पण कट्टतेतून घटना व कायद्याच्या आड येत असतील त्याचा विरोध करण्याची भूमिका काँग्रेसने घेतली पाहिजे.अन्यथा पक्षाचे 'पानीपत' होतच राहणार आहे.

# लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल

आधुनिक केसरी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

**भारताचे पहिले उपपंतप्रधान, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज ७२ वि पुण्यतिथी. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले. त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली.**

एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. विकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्न समजू लागले. १९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. शेतकऱ्यांचे हे आंदोलन त्यांनी अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. या आंदोलनात त्यांनी केलेल्या नेतृत्वाने महात्मा गांधी भारावून गेले. पुढे महात्मा गांधी यांच्या प्रत्येक चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला. या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली. १९४६ झाली स्थापन झालेल्या हंगामी सरकारमध्ये ते गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थांनचा प्रश्न व निर्वासितांचा प्रश्न व निर्वासितांचे प्रश्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली. बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीर च्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली. १९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# भुताने पछाडलेल्या घराचे भाडेकरू!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**भारतीय योगशैलीने आता सबंध विश्व व्यापले आहे. योगदिनाच्या निमित्ताने त्याचा प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणावर होत आहे. निरनिराळ्या क्षेत्रांतील सेलिब्रेटींच्या योगातील सहभागामुळे त्याला प्रचंड वलयही प्राप्त झाले आहे. परंतु ज्यांनी योगशिक्षणाच्या प्रसारासाठी आपले अवघे आयुष्य खर्ची घातले, त्या योगाचार्य बी.के.एस.अय्यंगार यांचे मात्र विस्मरण होतंय. योगाला आज प्राप्त झालेले हे महत्व पाहता ते आठवायला हवे होते. कारण जगाच्या सर्वांगीण घडणीत त्यांचे योगदान अनमोल आहे. त्यांची उपयुक्त माहिती श्रीकृष्णदास (बापू) निरंकारीजी यांच्या शब्दांत.**

योगमहर्षी बी.के.एस. तथा बेल्लूर कृष्णम्माचार सुंदरराज अय्यंगार यांचा जन्म दि.१४ डिसेंबर १९१८ रोजी कर्नाटकातील बेल्लूर, जिल्हा कोलार येथे झाला. हा पहिल्या महायुद्धाचा काळ होता. तशात देशभर इंफ्ल्यूएन्झाची भयानक साथ आलेली होती. त्यांच्या वडिलांना बालपणी त्याची लागण झाली. त्याकाळी हा रोग महाभयंकर समजला जाई. तशात त्यांच्या वयाच्या आठव्या वर्षी त्यांचे पितृछत्र हरपले. ते या अय्यंगार कुटुंबातील नववे अपत्य होते. त्यांचे कुटुंब एकंदर अकरा मुलांचे होते. वडिल शालेय शिक्षक होते. त्यावरून घरातील आर्थिक परिस्थिती काय असेल, याची सहज कल्पना येईल. त्यात भरीस भर म्हणजे त्यांना क्षयाची बाधा झाली. त्याकाळी हे दोन्ही आजार राक्षसीच होते. तेव्हा त्यावर औषधोपचार जणू नसल्यातच जमा होते. घरची परिस्थिती आणि साथीचे आजारपण यामुळे त्यावेळी १३-१४ वर्षांचे असलेले योगाचार्य अशक्तपणा, कुपोषणासह औषधोपचारांचा अभाव यामुळे निराशेच्या खोल गर्तेत गेले नसते तरच नवल. त्यांच्या वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांचे थोरले मेव्हणे एकदा त्यांच्या घरी आले. त्यांनी या अशक्त व रोगग्रस्तास पाहिले आणि ते म्हणाले, "अरे सुंद्रा- सुंदरराज, तू माझ्याबरोबर म्हैसूरला चल.'' त्यांचे नावही कृष्णम्माचारी होते. ते योगोपचार करीत आणि योग शिकवीत. त्यांना आपल्या घरी नेण्यामागे त्यांचा हेतू हा होता, की याला घेऊन जाऊन थोडेफार जुजबी उपचार करावे आणि त्याच्याकडून मुख्यतः घरगडी म्हणून कामे करवून घ्यावीत. ते त्यांच्यासोबत म्हैसूरला गेले व थोरल्या बहिणीकडे राहू लागले. कर्मधर्मसंयोगाने हा कालावधी केवळ सहा-आठ महिन्यांचाच होता. नंतर मेव्हण्यांनी त्यांना धारवाडच्या दौऱ्यावर नेले. त्याकाळचे पुण्याचे सिव्हिल सर्जन व्ही. बी.गोखले हे कृष्णम्माचारींच्या धारवाडच्या या योगवर्गासाठी आले होते. गोखल्यांनी त्यांच्याकडे एका योगशिक्षकाची मागणी केली. सुंदरराजला तेव्हा जुजबी इंग्रजी येत असल्याने त्यांनी गोखल्यांच्या विनंतीनुसार पुण्यास पाठविले.

इ.स.१९३८साली पुण्यातले घरभाडे योगप्रशिक्षकांना परवडणारे नव्हते. पुणे कॅम्प परिसरात एका भुताने पछाडलेल्या घरात भाडेकरू मिळत नसल्याने ते त्यांना किरकोळ भाड्याने मिळाले. लग्नाआधी अनेक वेळा



पूर्ण दिवस त्यांना कॉफी व पाण्यावर काढावा लागले. सन१९४२ साली जेव्हा त्यांनी संसार थाटला, तेव्हा तर मेहनतीला मर्यादाच उरली नव्हती. पण तरीही त्यांनी योगविद्येचा सराव सोडला नाही. शरीराला वेदना व थकवा जाणवत होता. अशा वेळी आपल्या मुलांकडून ते हात, पाय, कंबर आदी दाबून घेत असत. सन १९५१ ते १९६६ सालापर्यंत योगविद्या शिकविण्यास निरनिराळ्या ठिकाणच्या दौऱ्यांमध्ये जेवणाचे अतिशय हाल होत असत. त्या महिना-दोन महिन्यात त्यांचे वजन १५ ते २० पौंड कमी झालेले असे. पुण्यात योगविद्या शिकवायची म्हटल्यावर त्यांनी स्वतःचीच शागिर्दी पत्करली. स्वयं योगशिक्षण, त्यासंबंधीचे स्वतंत्र प्रयोग व शिकविणे सुरू झाले. योगाद्वारे त्यांनी स्वतःच स्वतःवर उपचार करून रोगांना पिटाळून लावले होते.

योगाचे लोकाभिमुख आणि लोकोपयोगी अंग विकसित करून त्यांनी विद्यार्थ्यांना व्यवहार्य योग शिकविला. रोगोपचार, आरोग्य आणि स्वास्थ्य लोकांपर्यंत पोहोचविणे हा हेतू त्यामागे होता. हे काम व्यापक पातळीवर पोहोचविण्याच्या उद्देशाने त्यांनी योगाच्या प्रचार-प्रसारार्थ अनेक विद्यार्थी जगभर घडवले. त्यातून योगविद्या जगभर झपाट्याने पसरली. त्यांचा प्रथम ग्रंथ ‘योगदीपिका’ हा याकामी मोलाचा दुवा ठरला. त्यांनी दुसरी वाहिनी हाताळली ती अशी- त्यांनी योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणेवर अभूतपूर्व प्रभुत्व मिळवले होते. त्यांच्या पुस्तकांतील छायाचित्रांतून याची प्रचीती येते. त्यांनी योगासने कलेच्या अंगाने पेश केली. त्यांची योग-प्रात्यक्षिके म्हणजे एक अत्युच्च कलाविष्कार असे. त्यांना योगातील मायकेल अॅन्जेलो अशी ख्याती युरोपात प्राप्त झाली होती. एखादा कवी काव्य करतो किंवा गायक बंदिशी बसवतो व पेश करतो तसे ते आसन संचलन करून लोकांना एका अनोख्या कलाविष्काराचा आनंद देत असत. त्यांच्या अप्रतिम योग-कलाविष्काराच्या अनेक ध्वनिचित्रफिती उपलब्ध आहेत. तिसरी वाहिनी म्हणजे ते स्वतः जी योगसाधना करत ती एक तत्त्वसाधना होती. ती निरपेक्ष, निर्हेतुक असे. योग-तत्त्वज्ञान जगणे व श्वासणे हा त्यामागे उद्देश असे. पतंजली योगसूत्रांच्या कोंदणात त्यांची ही साधना बसविलेली होती. ते म्हणत, "आपण स्वतःमध्ये काय करतो ते जाणा. स्वतःलाच प्रश्नोत्तरे करा. हे शिकवता येत नाही, पण शिकता येते. हा दिव्य अनुभव दाखवता वा पाहता येत नाही. त्याचा केवळ बोधच होऊ शकतो. मी जेव्हा योगसाधना शिकवतो तेव्हा वैज्ञानिक असतो. जेव्हा ती पेश करतो तेव्हा कलाकार असतो. पण स्वतः जेव्हा ही साधना करतो तेव्हा तिचा मी एक निरपेक्ष उपासक असतो, पूजक असतो, अनुष्ठाता असतो. ते अनुष्ठान असते." अशा प्रकारे त्यांची योगप्रणाली त्रिमुखी होती. त्यांचे जगभरातील विद्यार्थी हा त्रिमुखी योग होय.

योगा प्रशिक्षक अय्यंगार यांच्या मागचे दुर्भिक्ष्य संपले ते सन १९४३-४४ सालानंतरच. तोपर्यंत त्यांनी पुण्यात स्थिरस्थावर होत आपल्या योगविद्येच्या आधारावर जम बसवला होता. त्यांची आर्थिक विवंचनाही काहीशी कमी झाली होती. वयाच्या पस्तिशीनंतर तर आर्थिक संपन्नताही आली. योगासने-प्राणायामाने त्यांना केवळ स्वास्थ्य व आरोग्यच प्राप्त झाले नाही, तर दहा माणसांचे बळ, सामर्थ्य आणि उत्साह त्यांच्यात संचारले होते. त्यानंतर ६० वर्ष्यांत त्यांनी इतके प्रचंड कार्य केले की सामान्य माणूस तीन-चार जन्मांतही तितके कार्य करू शकले नसते. या वाटचालीत जगभरात जवळपास १२५ ते १५० अय्यंगार योग संस्था सुरू केल्या. हा सगळा विश्वव्यापी पसारा त्यांनी लीलया सांभाळला होता. सुमारे दहा लाख जणांना त्यांनी योगदीक्षा दिली. परोक्ष-अपरोक्ष ६०-७० लाख विद्यार्थी घडवले. जागतिक स्तरावर योगशिक्षणाचे संपूर्णपणे एकहाती व्यवस्थापन करून त्यांनी चमत्कारच घडवला होता. ५५-५६व्या वर्षी त्यांच्या शारीरिक क्षमतेबद्दल युरोपातील डॉक्टरांनी आश्चर्य व्यक्त कले. त्यांच्या काही वैद्यकीय चाचण्याही केल्या. त्यांची फुफ्फुस क्षमता १८-२० वर्षांच्या अॅथलीटला लाजवील अशी होती. पूर्वायुष्यात त्यांना फुफ्फुसांचा क्षय झाला होता. हे आपल्याला अविश्वसनीय वाटत असल्याचे या डॉक्टरांनी कबूल केले. त्यांच्या बाबतीत दुसरी अविश्वसनीय वाटावी अशी गोष्ट म्हणजे मृत्यूच्या वेळेखेरीज ते कधीही हॉस्पिटलची पायरी चढले नव्हते. अनेकांना वाटे की त्यांना ही शरीरसंपदा, स्वास्थ्य, आरोग्य आणि सामर्थ्य हे योगासने व प्राणायामाने प्राप्त झाले होते. मात्र याबाबतीत ते म्हणत असत, "योगासने-प्राणायामाचे स्वास्थ्य व आरोग्य हे अवांतर फळ असते. योगसाधना ही आरोग्यासाठी नसते, तर त्यातून जीवनामृत मिळते. जे ज्ञान-विज्ञानस्वरूप आणि आत्मानंद स्वरूप असते. या सगळ्या गोष्टींचे फलित म्हणजे स्वास्थ्य, आरोग्य, बल व सामर्थ्य होय. या बाह्य रंगाला भुलून जायचे नसते. योगाचे प्रधान फळ म्हणजे आध्यात्मिक बल होय! अय्यंगार गुरुजींचा भारी पगडा संपूर्ण समाजावर होता. बालक-किशोरांपासून सर्व सामाजिक-आर्थिक स्तरांतील लोक, आस्तिक-नास्तिक, बुद्धिवादी-भाववादी अशा सगळ्यांना भावेल, रुचेल, पचेल अशा प्रकारे ते योगविद्या शिकवीत. ते अष्टपैलू योग मार्गदर्शक होते आणि त्यातील प्रत्येक पैलूमध्ये ते एकमेवाद्वितीय होते. त्यांचे विद्यार्थी त्यांना हार्ड टास्क मास्टर म्हणून ओळखत. पण ते तेवढेच आणि तसेच नव्हते. येहुदी मेनुहिनसारख्या कलाकाराला ते अत्यंत हळुवारपणे शिकवीत. अशा योगविद्या प्रशिक्षकांनी दि.२० ऑगस्ट २०१४ रोजी आपला देह ठेवला.

!! जयंतीनिमित्त त्यांना शतकोटी विनम्र अभिवादन !!

# ऐकून घेण्याची कला आत्मसात करा !



आधुनिक केसरी

रोज प्रत्येक जण कुणाशीना कुणाशी संवाद साधत असतो. ज्यांना खरंच जिवनात यशस्वी व्हायचे आहे. त्यांनी आधी श्रोता झाले पाहिजे. बऱ्याच जणांच्या मनामध्ये न्यूनगंड असतो की मी का समोरच्याचे बोलणे ऐकून घ्यायचे. या अहंभावामुळे आपला नेहमी तोटाच होत असतो.त्यामुळे उत्तम परीणामकारक संवाद होऊ शकत नाही.मी मोठा किंवा समोरचा छोटा असा भेदभाव न करता सर्वांचे म्हणणे स्पष्टपणे जर ऐकून घेतले तर नक्कीच कुठेतरी चांगला संवाद घडू शकतो. बहुतांश लोकांना नेहमीच वाटते. समोरच्याने आधी माझे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे. वास्तविकता आपण स्वतः कमी बोलले पाहिजे.समोरच्या व्यक्तीचे म्हणणे आधी स्पष्टपणे ऐकून घेतले पाहिजे. उगाच घाईगडबडीत निष्कर्ष काढण्याची घाई करू नये. आपण जेव्हा बोलत असतो. तेव्हा आपला स्वभाव, आपले वागणे, बोलणे व आपला दृष्टिकोन समजत असतो. तेव्हा समोरच्या व्यक्तीचा नेहमी आदर केला पाहिजे. त्याला मानसन्मान दिला पाहिजे त्याचे बोलणे विचारपूर्वक ऐकून घेतले तर त्यालाही समाधान वाटते व दोघांच्यामध्ये उत्तम सुसंवाद होऊ शकतो. ज्यानां नेतृत्व करायचे आहे, अशांनी आधी श्रोता झाले पाहिजे. उत्तम श्रोताच उत्तम नेता होऊ शकतो.ज्यावेळेस आपण समोरच्याचे म्हणणे ऐकू तेव्हाच सकारात्मक चर्चा घडू शकते. बऱ्याच जणांना बोलताना मध्ये -मध्ये प्रश्न विचारायची सवय असते. कधी कधी मोबाईलवर बोलणे, समोरचा बोलत असताना लक्षपूर्वक न एकने, दुसर्याच विचारात गर्क होताना दिसतात.तेव्हा उत्तम संवादासाठी समोरच्याचे ऐकने खुप महत्वाचे आहे. समोरच्याचे म्हणणे ऐकून त्यास उत्तम प्रतिसाद दिल्यास आपण चांगला संवाद साधु शकतो. कधी कधी आपण समोरच्याचे बोलणे ऐकून न घेतल्यामुळे समोरच्याला आपण काय बोलतो आहोत हे समजत नाही. त्यासाठी बोलताना नेहमी स्मित हास्य करून बोलले पाहिजे. म्हणणे पटत असल्यास मान हलवून प्रतिसाद देणे हे खुप महत्वाचे आहे. समोरच्या व्यक्तीचे ऐकून व्यवस्थित घेतल्यास त्यास योग्य प्रतिसाद दिल्यास नक्कीच परीणाम कारक संवाद घडू शकतो. समोरची व्यक्ती कशी आहे. आपण त्यास कसा प्रतिसाद देत आहोत. हे महत्वाचे आहे. कधीकधी आपण समोरच्याला म्हणणं मांडण्याची संधीच देत नाही. त्यामुळे आपलेच नुकसान होते. ज्याला आयुष्यात पुढे जायचे आहे त्याने समोरच्याचे म्हणणे ऐकले पाहिजे. ऐकून घेणे फार मोठी कला आहे. त्याचबरोबर ऐकलेले समजून घेणे फार मोठे कौशल्य आहे. जीवन जगत असताना शांतपणे नम्रपणे समोरच्या व्यक्तीचे ऐकून घेणे व मगच उत्तर देणे हे फार महत्त्वाचे कौशल्य आहे. त्यासाठी प्रत्येकाने जिवनात ऐकून घेण्याची कला आत्मसात केली पाहिजे.

संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. ७७२१०४५८४५

# निसरड्या वाटेवरचा कठडा

आधुनिक केसरी

काकूंच्या डोक्यात चक्र फिरत होती. राजच्या आईला, नंदिनीला आधार हवा होता. आणि राज! तो तर बाबांसाठी व्याकुळ झाला होता. विचारात गढलेल्या त्यांच्यासमोर अचानक, समन्वय येऊन उभा राहिला. साक्षात्कार व्हावा तसा त्याला पाहून काकूंच्या डोक्यात विचार चमकला. आपण समन्वयलाचं विचारले तर... तो त्यांच्या पायाशी वाकत म्हणाला, काकू काही प्रॉब्लेम? कसल्या चिंतेत आहात? ये बैस ना बाळा. मला काळजी आहे ती नंदिनीची.. कसं होणार तिचं? केवढं आयुष्य पडलय तिच्या पुढे. धोक्याच्या वळणावर तिचं पाऊल घसरलं.. पण निष्पाप राजचा त्यात काय दोष? त्याला बाबा मिळायलाचं हवेत रे.

समन्वय एक विचारू? एक गोष्ट ऐकशील माझी.? लग्न करशील तू नंदिनीशी? दुर्दैवाने सरिता, तुझी बायको देवा घरी गेली. तुलाही जवळचे असे कुणी नाही. काकूंना थांबवत तो हसत म्हणाला, "तुम्ही आहात ना मला. पोरकं झाल्यावर मला माझ्या काका काकूंनी सांभाळलं, मायेचा वर्षाव केला त्यांनी माझ्यावर. पण ते दोघेही देवाघरी गेले. मी पोरका झालो. तुमच्या रूपात आईसारखी काकू मिळाली मला. तुम्ही सांगाल ते करीन मी. अगदी प्राण सुद्धा देईन मी तुमच्यासाठी..."

"वेड्या, तसलं काही नकोय मला. पण दोन जीवांच्या जीवाला जीव लावून त्यांचा तू आधारस्तंभ व्हावसं असं वाटतंय मला. राजला नाही पाह्यलंस तू. पण नंदिनीला ओळखतोस ना? लग्न करशील तिच्याशी ? तिला आधार मिळेल आणि निरागस राजला बाबा नाहीत. तुझ्या रूपात तेही त्याला मिळतील आणि काय आश्चर्य? समन्वयने होकार दिला. साधी सरळ कष्टाळू नंदिनी त्याला आवडली होती. परिस्थितीशी समन्वय साधून समन्वयने आधाराची हमी दिली. मग काय काकूंनी उत्साहाने पदर बांधला. दोघांना एकत्र आणून वर् माय आणि वधूमायचा रोल साधून लग्नाचा घाट घातला. पण आता, आधी त्यांना राजला सरप्राईज द्यायचं होतं. त्याच्या चेहऱ्यावरचा आनंद टिपायचा होता.

शुभ दिवस बघून त्यांनी समन्वयला नंदिनी कडे येण्याचं आमंत्रण दिलं. नंदिनी ला जवळ घेत त्या म्हणाल्या, "पोरी वनवास संपलाय तुझा. झालेल्या मनस्तापाला आवर आणि येणाऱ्या सुखाला आनंदाने सामोरे जाऊन सुखात रहा. ही माहेरची साडी नेस. हा गजरा घाल. आयुष्यभर ह्या फुलांसारखी टवटवीत रहा. जीवाला जीव देणारा खंबीर मनाचा भरभक्कम आधाराचा जोडीदार येतोय तुला घ्यायला. त्याचे स्वागत कर."

राजपुत्रा सारखा राजही नटला होता. घरभर पंचपक्वानांचा सुवास दरवळत होता. समन्वय येण्याची वेळ झाली. काकूंनी सनई लावली. राजला कळेना ही कसली गंमत चाललीय ? आईच्या गळ्यात पडून त्याने विचारले, "आई आजीने



सांगितलेल्या गोष्टीतला राजा येणार आहे का गं आपल्याकडे? आईने लाजून मान खाली घातली. काकू राजला कडेवर घेत म्हणाल्या, "खरंच राजे येणार आहेत. बाळा तुला बाबा हवे होते ना ? तुझे बाबाच येणार आहेत तुला आणि तुझ्या आईला घ्यायला.. तू वाट बघत होतास ना? येतीलच ते आता. टाळ्या वाजवत राज आनंदाने ओरडला "खरंच अगदी, खर्रच का गं आजी! अगदी खरंच येणार आहेत का माझे बाबा ? कुठे आहेत माझे बाबा? मी त्यांना अगदी घट्ट धरून ठेवीन."

दरवाज्याकडे धावणारा राज उंबऱ्यावर अडखळून खाली पडणार तोच भरभक्कम मिठीने त्याला सावरलं. पडणाऱ्या राजला समन्वयने आपल्या खंबीर हाताने सावरून कडेवर घेतलं होतं. काकू आनंदाने ओरडल्या राज बाळा, आले तुझे बाबा. घट्ट पकडून ठेव त्यांना. इन्स्पेक्टरच्या वेषातल्या समन्वयने राजला घट्ट पकडले होते. राज विचारत होता "खरच तुम्ही माझे बाबा आहात ? मला कधी सोडून नाही ना जाणार? समन्वय नंदिनी कडे मिस्कीलपणे पाहत म्हणाला, "नाही रे माझ्या पाडसा, तुला आणि तुझ्या आईला मी कधीच सोडून जाणार नाही. चोरांना बेड्या घालणारा मी, तुमच्या मायेच्या बेडीत जायबंदी झालोय. नंदिनीच्या गालावर गुलाब फुलले आणि वेणीतल्या मोगऱ्याच्या कळ्या उमलल्या. उतावळा नवरा झालेला समन्वय ड्युटी वरून घाईघाईत इन्स्पेक्टर च्या वेषातच आला होता. त्याच्याकडे बघून राज म्हणाला, "काकू आजी, माझे बाबा चोरांना पकडतात. पण तू तर भारी आहेस. पोलिसांच्या साहेबांना, म्हणजे माझ्या बाबांना कसं काय तू पकडून आणलंस? कशी फजिती झाली माझ्या बाबांची? आणि मग काय! नंदिनीच्या स्मित हास्याने, काकूंच्या खळखळून हंसण्याने आणि समन्वयच्या गडगडाटी हसण्याने ती खोली पण बहरली. नंदिनीला आधी काकूंचा आधार मिळाला होता.. आणि आता समन्वयच्या रूपाने निसरड्या वाटेवरचा कठडा मिळाला. तिच्या डगमगणाऱ्या नौकेला समन्वयचं सुकाणूच मिळालं होतं. रेडिओवर गाणं लागलं होत "जीवनात ही घडी अशीच राहू दे...."

**©®सौ. राधिका माजगावकर पंडित.
पुणे. 8451027554**

**(आवडल्यास शेअर करतांना कथेत कुठलाही बदल न करता मुळ लेखिकेच्या नावासहच शेअर करा ही विनंती. अशा सकारात्मक संदेश असलेल्या कथा वाचण्यासाठी माझ्या 9325927222 या व्हाट्सअप क्रमांकावर संपर्क साधा -मेघःशाम सोनवणे.)**

# राजकारणात भाषेची घसरण चिंताजनक



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**दिवसेंदिवस नेत्यांची भाषा असभ्य होत आहे. यासोबतच राजकारणाची पातळीही खालावते आहे. राजकारणात बरीच अधोगती झाली आहे, नेते आपल्या आचरणातून त्याचा परिचयच देत नाहीत, तर ते आपल्या भाषेतून सिद्धही करत आहेत. सोशल मीडियावरही ते असे शब्द वापरत आहेत, ज्यांना अपमानास्पद म्हणणे चुकीचे ठरणार नाही. सत्तेच्या लालसेपोटी नेत्यांची अभद्र भाषा गगनाला भिडू लागली आहे. किंबहुना आजकाल राजकारणी ज्या प्रकारे राजकारणात अमर्याद आणि स्तरहीन भाषा वापरत आहेत, ते लोकशाहीच्या पूर्णपणे विरुद्ध आहे. याचा परिणाम आपल्या लोकशाही राजकारणावर होत आहे. सध्याच्या राजकीय घडामोडी पाहता आजचे राजकारण दिशाहीन झाल्याचे दिसते.**

कोणत्याही पक्षाला किंवा नेत्याला विकास हा त्यांच्या निवडणूक प्रचाराचा मुद्दा बनवायचा नाही, त्यामुळे निकाल समोर आहे. निवडणुकीला अजून काही महिने बाकी असले तरी नेत्यांमध्ये एकमेकांवर चिखलफेक करण्याची स्पर्धा सुरू झाली आहे. राजकारणातील भाषेच्या घसरत्या पातळीमुळे भारतीय लोकशाहीचा आदर आणि प्रतिष्ठा दुखावली जात आहे. शव उपटून त्यांचा अपमान करण्यासाठी विरोधकांवर खळबळजनक आरोप करण्याचे काम राजकीय पक्ष करत आहेत.

अलीकडेच  महाराष्ट्रातील काही नेत्यांसह देशातील काही नेते, अपशब्द, खालच्या दर्जाची भाषा वापत विरोधकांना नामोहरम करत आहे.बोलतांना है नेते आपली संस्कृती विसरत आहे.

आजचे नेते देशाच्या मूलभूत समस्यांकडे दुर्लक्ष करून अशी वादग्रस्त विधाने जाणीवपूर्वक करतात, जेणेकरून देशातील नागरिकांचे लक्ष मूळ समस्येपासून वळवले जाईल. असे कृत्य करून ते लोकशाहीचीच नव्हे तर जनतेचीही चेष्टा करतात. व्होट बँकेचे राजकारण खेळण्यासाठी ते एका विशिष्ट जातीच्या लोकांवर आरोप-प्रत्यारोप करतात. आपले घुबड सरळ करण्यासाठी विशिष्ट जातीसमूहाला केंद्रस्थानी ठेवून ते देशाचे वातावरण बिघडवत असतात. संसदेबद्दल बोलायचे झाले तर तिथेही अनेक सदस्यांचे वर्तन निर्लज्जपणाच्या श्रेणीत येते. संसदेचे कामकाज सातत्याने विस्कळीत होत असून सभागृहात पत्रके फाडली जात आहेत. एकमेकांवर खुर्च्याही फेकल्या जात आहेत. आमचे३५ खासदार गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले आहै आपण अशा खासदारांना का निवडून देतो? याचं कोणकडे नाही. अशा प्रकारे भारतीय राजकारणाची पातळी दिवसेंदिवस घसरत चालली आहे. भारतीय राजकारण गलिच्छ झाले आहे. भारतीय राजकारण त्या अंधाऱ्या गुहेत अडकले आहे जिथे कोण सत्य बोलत आहे आणि कोण योग्य मार्गावर आहे हे कोणालाही माहिती नाही. राजकीय पक्षांनी पक्षहित बाजूला ठेवून ही घाण दूर करण्यासाठी काही तरी पुढाकार घ्यावा. तरच भारतीय राजकारणाला तिचा हरवलेला दर्जा परत मिळू शकेल. जाती-धर्माच्या मुद्द्यावर देशाचे विभाजन करून देशाला लुटण्याची अशा




लोकांची मानसिकता आहे. काही नेत्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि काही विशिष्ट जाती-धर्माच्या नावाखाली जनतेला फसवून आपले राजकारण चमकवायचे आहे. राजकारण्यांनी राजकारणाची पातळी इतकी खालावली आहे की सुशिक्षित लोक राजकारणात येण्यास कचरतात आणि त्यामुळे देशाला आतून पोकळ करणारे आणि खोट्या देशभक्तीचा पोशाख घालून समाजाला मूर्ख बनवणाऱ्या नेत्यांमध्येच अधिक भ्रष्ट, गुन्हेगारी वृत्तीचे नेते पोहोचतात. चलाबनवूया.

भारतात तरुणांची संख्या जास्त आहे. देशातील तरुणांनी जाती-धर्माच्या वर उठून स्वच्छ आणि स्वच्छ प्रतिमा असलेला आणि एकता, अखंडता आणि राष्ट्रवादावर देशासोबत असणारा नेता निवडून द्यावा. देशातील जनता जर या भोंदूबाबांच्या जाळ्यात अडकून जात आणि धर्माच्या आधारे नेते निवडले तर देशाची स्थिती आणखी बिकट होईल, ज्याला देशातील प्रत्येक नागरिक जबाबदार असेल. भारताच्या हितासाठी आणि विकासासाठी समर्पित नेते घडवून देशाच्या प्रगतीत सहकार्य करणे हे देशातील प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. भारतातील प्रत्येक नागरिक देशाच्या सध्याच्या स्थितीसाठी फक्त इतरांना जबाबदार मानत असेल तर ते योग्य नाही. भारताच्या स्थितीला आपण सर्वजण सार्वजनिकरित्या जबाबदार आहोत कारण आपण स्वतःमध्ये सुधारणा करत नाही आणि लोकांकडून सुधारण्याची अपेक्षा केली जाते.

देशातील प्रत्येक नागरिक हा खरा सैनिक आहे. तुम्ही जिथे असाल तिथे प्रामाणिकपणे आणि राष्ट्रीय भावनेने काम करा. तरच भारताला चांगल्या स्थितीत पाहण्याचे स्वप्न साकार होईल. देशाला भ्रष्टाचारी आणि गुन्हेगारांपासून वाचवायचे असेल तर सर्वसामान्य नागरिकांचे सहकार्य महत्त्वाचे आहे. स्वातंत्र्याच्या वेळी ज्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी बलिदान दिले, त्यांच्या आत्म्याला अधिक शांती मिळेल जेव्हा भारत माता भ्रष्ट आणि गुन्हेगारी नेत्यांच्या तावडीतून मुक्त होईल आणि स्वच्छ आणि देशभक्तीपूर्ण वातावरण असेल. या पुण्य कार्यात देशातील सर्व नागरिकांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण देशातील राजकारणाची पातळी इतकी खालावली आहे, ही अत्यंत चिंतेची बाब आहे, ती सुधारण्यासाठी देशातील प्रत्येक नागरिकाने देशभक्तीच्या भावनेने पुढे यायला हवे.

# 'काव्यप्रदेशातील स्त्री' मराठी काव्यातील स्त्री दर्शन घडविणारा संदर्भ ग्रंथ

आधुनिक केसरी

'काव्यप्रदेशातील स्त्री' हा किरण डोंगरदिवे यांचा वेगवेगळ्या कविंच्या काव्यातील स्त्रियांचे विविधांगी दर्शन घडवणारा ग्रंथ नुकताच हाती आला. 'अथर्व पब्लिकेशन' ने खूप सुंदर रुपात हा ग्रंथ वाचकांच्या हाती दिला आहे.  मराठी काव्यातील वेगवेगळ्या कालखंडातील स्त्री प्रतिमा समजून घेण्यासाठी हा एक महत्वपूर्ण ग्रंथ आहे. खरंतर कालखंड कुठलाही असो, स्त्री जाणिवेच्या कविता प्रत्येक कालखंडात लिहिल्या गेल्या. त्या आजही लिहिल्या जात आहे. उद्याही लिहिल्या जातील. प्रत्येक कविच्या कवितेतून वात्सल्य, प्रेम, मातृत्व, त्याग, अशी स्त्रियांचे अनेक रूपे बघायला मिळत असली तरी आदिम दुःखाचा एक समान धागा वेगवेगळ्या टप्प्यावर आपल्याला बघायला मिळतो. आधुनिकीकरण होताना स्त्रियांचा पदर बदलत गेला; पण पदरावरील दुःखाचे कशिदे  मात्र तसेच राहिले. नेमके हेच धागे शोधण्याचे काम किरण डोंगरदिवे यांनी केले आहे.   हे करत असताना वेगवेगळे संग्रह मिळवणे, चिंतन मनन करून लेख लिहिणे, लेखावरील प्रतिक्रियांची नोंद घेणे, यानिमित्ताने येणारे वेगवेगळे अनुभव त्यांनी खूप प्रांजळपणे आपल्या मनोगतात मांडले आहे. 'माता गुंतली कामासी, चित्त तिचें बाळापाशी' अशी आईची थोरवी सांगणारी जनाबाई असेल,किंवा 'स्त्री पुरुषांसाठी शाळा त्या घालाव्या, विद्या शिकवाव्या भेद नाही' असा समानतेचा, स्त्री शिक्षणाचा   संदेश देणारे ज्योतिराव असतील; या प्रत्येक लेखातून चिंतनशील मांडणी केलेली दिसून येते. सावित्रीबाई, बहिणाबाई, इंदिरा संत, शांता शेळके, केशवसुत, भा. रा. तांबे, साने गुरुजी, ना. घ. देशपांडे, मर्ढेकर, बोरकर, कुसुमाग्रज, करंदीकर, वामनदादा, अण्णाभाऊ साठे, नारायण सुर्वे, ग्रेस, दया पवार, नेमाडे, महानोर, ढसाळ, कोल्हटकर,अनुराधा पाटील, अशोक कोतवाल, सौमित्र अशा नव्या जुन्या पिढीतील ७४ कवि, कवयित्रींच्या काव्यातील स्त्री प्रतिमा शोधण्याचा प्रयत्न किरण डोंगरदिवे यांनी केलेला आहे. काव्यातील स्त्री प्रतिमा समजून घेण्यासाठी  या ग्रंथाचा मराठी साहित्यात नक्कीच स्वागत होईल, अशी आशा आहे. एक चिंतनशील, सुंदर असा संदर्भग्रंथ वाचकांच्या हाती दिला, त्याबद्दल कवी आणि प्रकाशक दोघांचेही खूप खूप अभिनंदन.



**-संतोष दिगंबर आळंजकर,**
**मु. शहापूर पो. घोडेगाव**
**ता. गंगापूर जि. औरंगाबाद.  मो. 9423724450**

# राजकारणात व्हेग बोलण्याची प्रवृत्ती बळावते का?



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**शिंदे-फडणवीस सरकारने निर्भया निधीचा वापर पोलीस खात्यात वाहने खरेदी करण्यासाठी केल्याचा आरोप राष्ट्रवादी पक्षाच्या नेत्या खा. सुप्रियाताई सुळेंनी निर्भयपणे केला असला तरी राजकारणात व्हेग बोलणं किती अंगलट येतं? याचं उदाहरण समोर आलं. त्यांच्या खुलाशाला धाडसीपणातुन उत्तर देताना भाजपाच्या महिला प्रदेश अध्यक्षा चित्राताई वाघांनी महाविकास आघाडी सरकारच्या काळात निर्भया निधीचा वापर पुर्णत: झाला हे सांगताना पोलीस खात्यात किती वाहने आली? आणि कोणत्या मंत्र्याकडे किती वाहने गेली? याचा हिशोबच सादर केला.**

सत्ताधाऱ्यांना काम करू द्यायचं नाही. केवळ त्यांची बदनामी करायची. हीच मानसिकता घेवुन विरोधक जर समाजात काम करू लागले तर सर्वसामान्य जनतेचा त्यांच्यावर असलेला विश्वास उडाल्याशिवाय रहात नाही हे तितकंच खरं. बोलायचं म्हणुन बोलायचं हे सुप्रियाताईच्या नेतृत्व्ााला शोभते का? असे अनेक सवाल निर्भया निधीच्या गदारोळानंतर पुढे आले. 2019 मध्ये सत्ता स्थापनेसाठी जनाधार भाजप-शिवसेना युतीला मिळाला होता.केवळ मुख्यमंत्री पदासाठी जनादेशाला ठोकर मारत शिवसेना नेते उद्धव ठाकरेंनी महाविकास आघाडी स्थापन करण्याचा निर्णय घेतला. ज्यात मुख्यमंत्री पद शिवसेनेला देण्यात आलं अर्थात उद्धव ठाकरे. वास्तविक पाहाता तत्कालीन काळात ठाकरेंनी जनादेश डावलला नसता तर राष्ट्रवादी आणि काँग्रेस सत्तेच्या सारीपाटावर आलीच नसती. या साऱ्या घडामोडीत संजय राऊतांनी कमालीचा घेतलेला सहभाग कारणीभुत ठरला. शिवसेना बारामतीकरांच्या दावणीला बांधण्यात राऊतांसारखे कारणीभुत ठरले. ज्याचे परिणाम कालांतराने शिवसेना दुभांगणीत झाले. कधी कधी नियतीला जे मान्य असतं तेच घडतं. अडीच वर्षे मुख्यमंत्री पद उद्धव ठाकरे यांना मिळालं. पण करोनासारख्या संकटाने पदाची मजा आणली नाही यालाच नियतीचा खेळ म्हणतात. रात्रीतुन गुवाहाटीचा स्फोट झाला. एकनाथ शिंदेंच्या रूपाने 40 आमदार बाहेर पडले. राज्यात स्थिर सरकार असावं.एव्हाना स्वच्छ प्रशासन देण्यासाठी भाजपाने सरकार बदलात उडी घेतली. सद्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने सरकार बनलं आणि शिंदे-फडणवीस पुन्हा आले. ठाकरे अडीच वर्षाची कारकीर्द लोकांनी पाहिली. प्रचंड भ्रष्टाचार करोना संकटातही केला. सत्तेचा गैरवापर करत प्रचंड मलिदा खाण्याचं काम महाविकास आघाडी सरकारात झालं. सत्ता असताना दोन मंत्री जेलात जाणं अर्थात ठाकरे सरकारची ओळख वसुली सरकार म्हणुन पुढे आली. कारण गृहमंत्री (तत्कालीन) अनिल देशमुख यांच्यावर 100 कोटी वसुलीचा आरोप जे आजही जेलात आहेत. नवाब मलिकसारखे मंत्री बंद खोलीत आहेत. लोकांच्या मनातलं हे सरकार नव्हतं. म्हणुनच की काय? पाच महिन्यापुर्वी राज्यात एका रात्रीतुन महाविकास आघाडी सरकारचं सरकार गेलं आणि शिंदे-फडणवीसांचं सरकार आलं. एक गोष्ट खरी आहे सत्ता हातुन गेल्यानंतर विशेषतः मातब्बर पुढाऱ्यांना झोप लागणे शक्य नाही. कारण सत्तेशिवाय रहाणे अनेकांना पसंत नसते. जय-पराजय राजकारणात चालतो पण पराजय पचवण्याची हिंमतही अनेकांच्या नेतृत्वात नसते. म्हणुन कदाचित बावचळल्याप्रमाणे विरोधी बाकावर बसुन विरोधाला विरोध करत असतात. पाच महिन्यात शिंदे-फडणवीस सरकारने जनतेच्या हिताचे अनेक महत्वाचे निर्णय घेतले. विकासाची प्रलंबित कामे मार्गी लावताना शेतकऱ्यांना वीजेचा त्रास होवु नये म्हणुन कनेक्शन तोडू दिले नाही. त्याउलट ठाकरे सरकारच्या काळात शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल झाले. अतिवृष्टीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत द्यायला सरकार पुढे आले. याउलट ठाकरे सरकारने दमडी मदत शेतकऱ्यांना केली नाही. हे सरकार आल्यापासुन शेतकऱ्यांना विमा मिळायला सुरू झाला.ठाकरे  सरकारच्या काळात दमडी शेतकऱ्यांना मिळाली नाही. विकासाचे अनेक प्रश्न रोखुन धरले. ते सरकार पुरे करत असुन वसुली बंद झाली हे तितकंच खरं. स्वच्छ आणि



पारदर्शक सरकारचा कारभार असुन राजकिय हेतुतुन अनेक आमदारांच्या मतदारसंघात निधी मिळत नव्हता. ती सर्व कामे आता सुरूळीत होताना दिसतात. शिंदे-फडणवीस सरकार साहजिकच विरोधकांच्या डोळ्यात सलसल होणे म्हणावे लागेल. कारण कुठलेही तथ्य नसताना वेगवेगळे आरोप सरकारवर केले जातात. काँग्रेस प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांच्यापासुन जयंतराव पाटील, छगनराव भुजबळ, अमोल मिटकरी ही सारी मंडळी अलीकडे तर रोहित पवार बेछुट आरोप करताना दिसतात. ज्या आरोपाला कुठलाही आधार नाही. काल परवा सुप्रियाताईनं तर कहरच केला. ठाकरे सरकार बनवताना सुप्रियाताईची भुमिका आघाडीची राहिली. पण अचानक त्यांनाही सत्तेच्या गादीवरून जमिनीवर बसावं लागलं. तिळपापड होणं साहजिकच. काय तर म्हणे निर्भया फंडाचा वापर सरकारी वाहने खरेदीसाठी केला असा जाहिर आरोप सुप्रियाताईनी माध्यमासमोर येवुन केला. कधी कधी प्रश्न असा पडतो अलीकडच्या काळात राजकारणात वेग आरोप करण्याची प्रवृत्ती बळावत असुन राजकारण कुठल्या स्तराला जाईल हे सांगता येत नाही. अमोल मिटकरी सारख्यानं चंद्रकांतदादा पाटलावर अपशब्द वापरले ज्यातुन प्रेरणा घेवुन पुण्यात एका तरूणाने मिटकरीचाच अपशब्द वापरत मंत्री चंद्रकांत पाटलांच्या चेहऱ्यावर शाई फेकली. गंमत बघा, केवळ बोलघेवड्या पुढाऱ्यामुळे कोण कुठला आदर्श घेईल? आणि काय करेल? हे सांगणे अवघड. विरोध वैचारिक केला पाहिजे. मतभेद असले तरी मनभेद नसले पाहिजेत. ज्यांनी चाळीस वर्षापासुन महाराष्ट्राचं नेतृत्व केलं, चार वेळा मुख्यमंत्री पद सांभाळलं. अशा मातब्बर नेतृत्वाखाली महाराष्ट्राचं राजकारण आज कोणत्या दिशेने कुठे वळताना दिसतं? हेच कळेना. सुप्रियाताईचा आरोप निर्भय असला तरी तो केवळ विरोधाला विरोध म्हणुन उघडा पडला यात शंका नाही. कधी कधी चांगल्या नेतृत्वावरचा सामान्य जनतेचा विश्वास उडल्या जातो. त्याचं कारण राजकारणात सत्तेचा मार्ग लोकांनाही पटतो. हा आरोप करताना कुठलाही आधार नाही. बिनबुडाचा आरोप काय तर म्हणे निर्भया फंड सरकारी वाहने खरेदीसाठी केला. सद्याच्या सरकारवर आरोप केला पण ही खरेदी महाविकास आघाडी अर्थात त्यांची सत्ता असतानाच झाली मग तोंडघशी कोण पडलं याचं आत्मपरीक्षण सुप्रियाताईंनी करायला हवं. राजकारणात आरोप-प्रत्यारोप होत असतात. पण जागृत नेतृत्व जशास तसं उत्तर द्यायला तयार असतं. भाजपाच्या महिला प्रदेश अध्यक्षा चित्रा वाघ यांनी देखील सुप्रियाताईच्या आरोपाचा फडशा पाडत धाडसी भुमिका घेत खरपुस समाचार घेतला. निर्भया फंडाचा हिशोब सादर करताना त्यांनी महाविकास सरकारच्या काळात कोणत्या मंत्र्याकडे किती वाहने? तपशीलासह दाखल केले. 220 वाहनांची खरेदी करताना 121 वाहने ठाकरे सरकारने 04 फेब्रुवारी 2022 रोजी मुंबईतील 94 पोलीस ठाण्यांना दिली. वेगवेगळ्या विभागांना 99 वाहने दिली. छगन भुजबळ, विजय वडेट्टीवार, सुभाष देसाई आदी मंत्र्यांकडे निर्भया फंडातून खरेदी केलेली वाहने गेल्याचे पुराव्यासह त्यांनी सादर केले. आता सुप्रियाताई काय बोलणार? चित्राताईनी सत्य परिस्थिती समोर आणल्यानंतर हे माझं चुकलं असं म्हणत त्यांनी खरं तर माध्यमांसमोर येवुन शिंदे-फडणवीस सरकारची जाहिर माफी मागायला हवी. पण हे आगा कळेल कुणा? म्हणुनच राजकारणात वेग बोलणं कधी कधी कसं अंगलट येतं? आणि आपण तोंडघशी कसे पडतो? याचं उत्तम उदाहरण म्हणजे आदरणीय सुप्रियाताई सुळे.

# 'मोतीबागे'च्या सहवासातील लख्ख आठवणी...

आधुनिक केसरी

**संघाच्या कार्यालयासाठी मोतीबाग घेण्यापासून ते अगदी आतापर्यंतच्या म्हणजे गेल्या सत्तर वर्षांतील अनेक घटनांचा मी साक्षीदार आहे. मोतीबागेच्या आधीपासून त्या भागात संघाच्या अनेक शाखा होत्या आणि प्रत्येक शाखेचं स्वरूपही मोठं होतं. कार्यालय लागतं, ते छोटया-मोठया बैठका, कार्यक्रम, अधिकाऱ्यांना थांबण्यासाठी जागा आदी गोष्टींसाठी. मोतीबागेच्या परिसरात तेव्हा संघाचा व्यापक संपर्क होता आणि शाखांचं जाळं होतं. कार्यालय असं नव्हतं, पण काही गोष्टी मला चांगल्या आठवत आहेत. मी तरुण होतो. त्यामुळे जागाखरेदीचे पूर्ण तपशील माहिती नाहीत. मात्र, कार्यालय म्हणून ही जागा घ्यायची, यासंबंधी सुरू असलेल्या वाटाघाटीच्या गोष्टी आमच्या कानावर येत होत्या. सरदार बिवलकर यांनी संघासाठी हा विषय खूपच सहानुभूतीनं आणि सहकार्यानं घेतला होता. त्यामुळे तो व्यवहार पुढच्या चार-पाच वर्षात खूपच सुकरतेनं पार पडला. तिथे आपलं कार्यालय होणार आहे हे कळल्यानंतर आम्ही कुतूहलानं जाऊन ती जागा बघितल्याचंही आठवतं.**

मोतीबागेत त्यावेळी मोटार गॅरेजची शेड आणि गाड्या धुण्यासाठीचा चढाव होता. दोन-चार खोल्या होत्या. हळूहळू त्याचं रूपांतर कार्यालय या स्वरूपात झालं. मोतीबागेत भरणाऱ्या प्रल्हाद शाखेवर १९५६ साली माझी मुख्य शिक्षक म्हणून नियुक्ती झाली. पुढे साडेचार वर्ष मी त्या शाखेवर होतो. माझी वैद्यकीय महाविद्यालयाची सगळी वर्ष मी त्या शाखेवर होतो. शिक्षक, मुख्य शिक्षक आणि दोन वर्ष कार्यवाह. या सगळ्याच्या आठवणी खूप आहेत आणि ताज्या आहेत.

महाराष्ट्र प्रांताचं शिबिर १९५६ साली अरण्येश्वर येथे झालं. त्याच्या माझ्या आठवणी पक्क्या, भक्कम, जणूकाही काल घडलं असं वाटावं इतक्या ताज्या आहेत. प्रल्हाद शाखेवर मी तेव्हा मुख्य शिक्षक होतो. सर्व मोकळा भाग होता. मैदान, तेथेच मांडव. मग शिबिर उभारणीसाठी खड्डे खणणं असेल, मंडप घालणं सर्व कामं स्वयंसेवकांनीच केली होती. त्या शिबिरात चौतीसशे संख्या होती सबंध प्रांताची. त्याला अधिवेशन म्हटलं होतं. संघकामाला गती देण्यासाठी आमविश्वास जागृत होण्याच्या दृष्टीनं ते शिबिर उपयोगी ठरलं.

पुण्याच्या घोषानं त्यावेळी आपला गुणात्मक ठसा उमटवला होता. काका ताम्हनकर, बापूराव दात्ये, बाळासाहेब करंदीकर या घोषातल्या दिग्गज कार्यकत्यांमुळे हे घडलं. घोषपथकांची रचना त्यांनी केली, घोष पथकं उभी केली. घोषातलं संघजीवन फार खडतर होतं. राबवणं हा शब्द बरोबर नाही. पण तेव्हाच्या भाषेतला शब्द म्हणजे अगदी पिदाडून घेत असत. दसऱ्याच्या आधी किमान दीड महिना कसून मेहनत चालत असे. रविवारी तर सकाळी कमीतकमी चार तास सराव व्हायचा. रोज दीड-दोन तास व्हायचा. सगळ्या वाद्यांची उत्तमरीतीनं तयारी करून घेणं, वाद्य स्वच्छ करणं, शृंग पथकातील वाद्यांना पॉलीश हे महिना-दीड महिना चालत असे. त्यामुळे पुण्याच्या घोषाचं एक अतिशय उत्तम रूप उभं राहिलं. फारच सुंदर घोष होता. वादकांची संख्याही किमान साठ ते शंभरपर्यंत पोहोचली असावी. आनक, शृंग, वंशी आणि शंख अशी दलं होती. नागूरचा आणि पुण्याचा घोष यात स्पर्धा असे. ती चर्चा नेहमी गाजायची. निश्चितपणे स्पर्धा होतीच; पण पुण्याचा घोष फार श्रेष्ठ होता. शृंग घोष होता आणि मध्यल्या काळात पाच-सहा वर्ष कुक्कुट घोषही होता. साधारण १९५८ चा तो काळ होता, तेव्हा घोषाचं पूर्णतः भारतीयीकरण झालं. संपूर्ण घोषाचं केंद्र हे त्यावेळी मोतीबागच होतं. तिथेच घोषासंबंधीच्या सगळ्या घटना घडत. रचना चाले. माहिती दिली जात असे. झालेले बदल हे प्रत्यक्षात येत असत.

मोतीबागेतील विविध विभाग हे देखील वैशिष्ट्यपूर्ण होते. भांडार विभागात श्रीपादराव सरदेशपांडे होते. कार्यालय व्यवस्था म्हणून सर्वप्रथम राजाभाऊ कुलकर्णी होते. ते पाचएक वर्ष होते. पण कार्यालयावर जास्तीतजास्त छाप ही आबा अभ्यंकरांची राहिलेली आहे. ते दीर्घकाळ या व्यवस्थेमध्ये राहिले. सगळ्या अधिकाऱ्यांचं येणं-जाणं, प्रवास व्यवस्था, खानपान व्यवस्था, मोतीबागेत येणाऱ्याची दखल घेणं या सगळ्या गोष्टी होत असत. ध्वनिव्यवस्थेत बाळासाहेब आपटे काम करत. प्रांताचे प्रचारकही तेथे थांबत असत. त्यांचाही तेथे सहवास असे. तेही व्यवस्थेत लक्ष घालत.

बाळासाहेब साठे जेव्हा शहर प्रचारक म्हणून आले, तेव्हा मोतीबाग हे कार्याचं केंद्र झालं. व्यक्तिगत संपर्क, काही कार्यक्रमांची रचना, योजना यात बाळासाहेबांचा सहभाग असे.

श्रीगुरुजींच्या अनेक बैठका तिथल्या मला आठवत आहेत. मा. दादाराव परमार्थ, यादवराव जोशी, एकनाथजी रानडे यांचीही बैठक आठवते. मा. यादवराव, एकनाथजी यांचे बौद्धिक वर्गही झाल्याचं मला आठवतं. मा. बाबाराव भिडे यांचे अनेक बौद्धिक वर्ग तेथे झाले होते. संस्कृतपंडित श्री. भा. वर्णेकर यांचा संस्कृतमध्ये झालेला




(राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. अशोकराव कुकडे यांनी सांगितलेल्या आठवणींचे शब्दांकन.)

बौद्धिक वर्गही मला आठवतो. शहराचे कार्यक्रम, उपक्रम, शहराची मासिक बैठक मोतीबागेतच होत असे. एक चळवळीचं चांगलं केंद्र, जिथे स्वयंसेवक सारखे येत आहेत, संवाद होत आहे, गप्पा-गोष्टी होत आहेत, असं ते केंद्र बनलं होतं. अप्पासाहेब सोहनी आणि चिं. ना. उर्फ बंडोपंत परचुरे हे दोघे मंडल प्रमुख ज्यांनी या सबंध कामाला फार मोठी गती दिली, त्यांचा मी जरूर उल्लेख करीन. तरुण स्वयंसेवकांशी संपर्क, संवाद, त्यांना कार्यक्रमात सहभागी करून घेणं हे ते करत असत. मी प्रल्हाद शाखेवर म्हणजे मोतीबागेतील शाखेवर मुख्यशिक्षक असतानाच मा. अटलबिहारी शाखेवर स्वयंसेवक म्हणून आले होते. अगदी शाखावेषात आले होते.

मला वाटतं जनसंघाची काही बैठक होती. त्या सगळ्यांचा मुक्काम नातू मंगल कार्यालयात होता. कन्याशाळेच्या समोर ते कार्यालय होतं. त्यामुळे सगळे संध्याकाळी शाखेवर आले होते. रघुनाथराव देशपांडे त्यावेळी शहर कार्यवाह होते. ते मला म्हणाले, तूच शाखा घ्यायची आहेस. म्हटलं, हे सगळे मोठेमोठे लोक आलेत..., तर म्हणाले येऊ दे की, ऐकतील सगळं. ते सगळे आले शाखेवर. शाखा संपल्यानंतर मंडलात उभं राहून सगळ्यांनी परिचय करून दिला. अटलजींनी स्वतःचा परिचय करून दिलेला माझ्या अगदी पक्क्या स्मरणात आहे. डोळ्यापुढे आहे आजही. पं. प्रेमनाथ डोगराही आमच्या शाखेवर आले होते.

प्रांतिक बैठका बहुशः मोतीबागेतच व्हायच्या. अशा अनेक बैठका मला आठवतायंत. मा. बाबा भिडे यांच्या उपस्थितीतील बैठका, मा. अखिल भारतीय कार्यकत्यांचे प्रवास, बैठका हेही माझ्या स्मरणात आहे. बाबांच्या बैठकीत प्रत्येक कार्यकर्त्याची दखल किंबहुना मी हा शब्द वापरला तर अयोग्य होणार नाही, म्हणजे कार्यकर्त्याची उलटतपासणी घेतली जायची. ते स्वरूप कधीकधी तिखट तर कधीकधी रंजक असंही होत असे. बाबा तपशीलवार सगळ्या गोष्टींची माहिती घेत असत आणि त्या माध्यमातूनच अनेक गोष्टी सगळ्यांच्यासमोर मांडायचा प्रयत्न करत असत.

मोतीबागेचा इतिहास हा तिथल्या वास्तूचा दगडामातीचा इतिहास नाही. हा इतिहास तिथे जे काही काम उभं राहिलं, त्या माध्यमातून कार्यकर्ते निर्माण कसे झाले, तिथे वास्तूमध्ये राहणारे किंवा येणारे ज्येष्ठ कार्यकर्ते त्यांचा प्रभाव कशा पद्धतीनं इतरांवर पडत गेला, त्यांच्याकडून वेगवेगळे विषय कसे विकसित झाले, असा तो सगळा विषय आहे, असं मला वाटतं.

मा. दामुअण्णा दाते, मुकुंदराव पणशीकर यांचं वास्तव्य मोतीबागेत खूप दीर्घकाळ होतं. या दोघांनी महाराष्ट्राच्या संघकामावर आणि अन्य क्षेत्रातील विविध कामांवर विलक्षण छाप पाडलेली आहे. काही काही नवीन विषयांचं उगमस्थान मोतीबागेत आहे, असं निश्चितपणे म्हणता येईल. आज जो विषय सर्वदूर झालेला आहे तो म्हणजे समरसता मंच. पूर्णपणे काही कल्पना संघानं समाजात कशा रुजवल्या, प्रस्थापित केल्या त्याचं हे उदाहरण. हा विषय पूर्णपणे नव्यानं विकसित केला गेला आणि याचं फार मोठं श्रेय हे दामुअण्णांचं आहे. एखादी संज्ञा निर्माण करणं, प्रस्थापित करणं, रूढ करणं, रुजवणं असं हे उदाहरण आहे. दुसरा असाच एक विषय आहे. महिलांचं स्थान काय संघात, असं विचारलं जायचं. त्यातून पुढे भारतीय स्त्री शक्ती हे संघटन उभं राहिलं. महिलांचे वेगवेगळे विषय घेऊन संघविचाराच्या आधारावर त्या क्षेत्रात काम उभं केलं गेलं. भारतीय स्त्री शक्ती या संघटनेच्या उभारणीमध्ये नाना ढोबळे, दादासाहेब बेंद्रे यांचं मोठं योगदान होतं. आज ते अखिल भारतीय स्वरूपाचं संघटन आहे. हे दोन्ही विषय पूर्णपणे मोतीबागेत जन्माला आले. अशाप्रकारे अखिल भारतीय विषयांना जन्म देणं ही प्रक्रिया मोतीबागेत झालेली आहे. नित्य संघकामाखेरीज इतरही काही विषय मोतीबागेतून विकसित झाले. पहिला म्हणजे हिंदुस्थान साहित्य. जो पूर्णपणे नव्यानं विकसित झालेला विषय होता. बापूराव दात्ये यांनी तो सुरू केला. वेगवेगळी प्रकाशनं सुरू झाली आणि पूर्णपणे नवीन दालन संघकामाचं उघडलं गेलं. दुसरं म्हणजे जनकल्याण समितीचं पहिलं कार्यालयही मोतीबागेतच झालं. मा. प्रल्हादजी अभ्यंकर अध्यक्ष होते, नंतर अप्पासाहेब सोहनी अध्यक्ष झाले.

**क्रमशः**

# बापलेकी




संध्या सिनकर
संपर्क क्र. 9920740645

आधुनिक केसरी

**आई मुलींच्या नात्याबद्दल लिहिलेलं खूप साहित्य आहे. पण बाप लेकी हे कुटुंबातलं काहीस दुर्लक्षित राहिलेले नातं आहे. पद्मजा फाटक, दीपा गोवारीकर व विद्या विद्वांस यांनी संपादीत केलेल्या, बापलेकी या पुस्तकात लेकिंनी त्यांच्या वडिलांबद्दल लिहिलेली मनोगते, स्वानुभव व आठवणीनी अतिशय वाचनीय झाली आहेत. दीपा गोवारीकर त्यांचे वडील दादासाहेब आळतेकर यांच्याविषयी म्हणतात, आई, दादांना कायम घाबरलेली असे.**

माझ्या आयुष्यातली कितीतरी वर्ष दादांना घाबरण्यात गेली. दादांना ब्रह्मचारी राहून देशसेवा करायची होती. पण आजोबांनी त्यांचं लग्न लावून दिलं व त्यांना वकीली करायला भाग पाडलं. पायातल्या ह्या नकोश्या बेड्या कर्तव्य कठोरपणे सांभाळताना त्यांचा क्रोध अनावर होई. रागावले की ते निर्जीव वस्तूवर पण राग काढत. आत्मशोध घेताना दीपा गोवारीकर म्हणतात, दादांच्या तापटपणाची कथा एवढ्यावरच संपली नाही. त्याचा शेक आम्हा भावंडांना कमी अधिक प्रमाणात लागला. पण हा तापटपणा वारसा हक्काने माझ्या मध्ये आला त्याचे क्लेश खूप आहेत. तो संताप माझ्यात उतरला आणि माझ्यातून झिरपत माझ्या मुलालाही व्यापून राहिला आहे. माझ्या संतापाची टिंगल करणारा मुलगा त्याच्यावर नौबत आली की रागाने बेभान होतो. मग आई म्हणायची ते आठवतं अति राग भीक माग. त्याहून राग देशत्याग. त्याहून राग प्राणत्याग. आता माझा राग निवळला आहे आणि मुलगा ह्या काळात जन्माला आल्याने पाणी बघून वळण बांधणारा आहे. दादा तापट होते व अहमन्य होते. ते सहजपणे दुसऱ्याचा पाण उतारा करत, तुच्छता दाखवत. कुणी प्रेमाने भेटवस्तू दिली की ते कोरडेपणे विचारत ही अडगळ आता माझ्या घरात कुठे ठेवायची ते सांगा. असे असले तरी ज्ञानलालसा, निरलसता व सडेतोडपणा असे अनेक सद्गुणही त्यांच्यात होते. स्मिता भागवत यांनी त्यांच्या वडिलांविषयीच्या भावना पत्ररूपातून व्यक्त केल्या आहेत. त्या म्हणतात, आदर्श जीवन जगणाऱ्या खूप व्यक्तींची वार्धक्यात उतरण होते. त्यांना वडिलांकडे बघून मुळात देखणा असलेल्या पण वार्धक्यात विरूप झालेल्या सिंहाचे चित्र आठवते. त्या म्हणतात घरात नवीन सून आल्यावर नव्या घरात सूनेने साऱ्या अनोळखी माणसांचं मन जिंकण्याची वाट पाहण्यापेक्षा तिचं एकटीच मन सर्वांनी जिंकणं सोपं आहे. हा वडिलांचा विचार अतिशय चांगला होता. पण सूनेशी चांगलं वागताना त्यांनी अम्माला खाली खेचून चांगुलपणा स्वतःकडे खेचण्याचा प्रयत्न केला. बाहेरच्या जगातही त्यांचे टीकास्त्र धारदार बनल्याने ते एकटे पडत गेले. अभंग आत्मविश्वास व कणखर मन स्मिता भागवत यांना त्यांच्या आई-वडिलांकडून मिळाले.

अनुराधा पोतदार त्यांचे वडील वि. द. घाटे यांच्या वागण्याचं, त्या दोघांच्या नात्याचे विश्लेषण करताना म्हणतात, माझी आई फार लवकर गेली. तेव्हापासून त्यानी जाणवू दिलं नसलं तरी दादा संसारात एकटे होते. त्यांच्याही अंतर्मयीच्या शक्ती मंदावत असतील. सभोवतालच्या समस्या संपत नसल्यामुळे दादांच्या वृत्तीत अलिप्तपणा आणि दुरस्थपणा आला असावा. पण त्यांना विचारांती वाटले अशी अलिप्तता, स्वकेंद्रितपणा व तडजोडी सहसा न स्वीकारण्याचा मानीपणा दादांच्या वृत्तीत मुळचाच होता. परिस्थितीच्या प्रवाहात स्वतःच्या उर्वरित शक्ति जपण्याच्या मानवी प्रवृत्तीमुळे हे घटक वृद्धिंगत झाले असावेत.




अनुराधा पोतदार यांना त्यानी वयाची सत्तरी ओलांडल्यावर हे तीव्रतेने जाणवलं. आपल्या समस्या आपण सोडवलेल्या असतात किंवा त्या सुटणार नाहीत हे कटू सत्य आपण स्वीकारलेलं असतं. ही एक अटळ जीवनरीत आपण अनुभवत असतो. प्रपंचातील एकटेपणात हे सारे प्रकर्षाने घडते. अशावेळी आपल्या प्रियजनांच्या अगदी मुलांच्याही समस्यांचा भार आपल्यावर पडू नये असं वाटतं. त्यातूनच दादांची वृत्ती अशी बनली असावी. प्रिया तेंडुलकर त्यांचे वडील विजय तेंडुलकरांविषयी सांगताना म्हणतात, बाबा म्हणत लोक काय बोलतात तिकडे लक्ष देऊ नकोस. तू करणारी हो, म्हणणारी नाही. ते कुठल्याही अडचणीच्या प्रसंगी, संकटात कायम प्रियाजींबरोबर असत. त्या म्हणतात व्हेन बाबा इज देअर व्हाय टू फीअर हे साईबाबांच्या पोथीतील वाक्य बाबालाही लागू पडतं. प्रा मे पुं रेगे व त्यांच्या दोन मुली, डॉ.वसंतराव गोवारीकर व त्यांच्या तिन मुली, जाई निंबाळकर व गौरी देशपांडे या दोघी बहिणी अशी एकाच कुटुंबातील वेगवेगळ्या व्यक्तींची मनोगत वाचताना नाती तीच असली तरी मुलींना वाढवण्याची पद्धत, अनुभवानुसार, वयानुसार व परिस्थितीनुसार बदलत जाते हे समजते. पुस्तकात वडिलांचीही दहा मनोगते आहेत. मुलीला वाढवताना मी ही वाढतो आहे समृद्ध होत आहे याची जाण बहुतेक मनोगता मधे दिसते. बोस्टनला राहणारे उच्चशिक्षित मनोज पदकी हे आपलं उत्तम करिअर सोडून दत्तक मुलगा व मुलगी यांच्या संगोपनात रमतात. त्यांनी आपली मुलगी सुप्रिया विषयी लिहिलेला लेख अतिशय हृद्य आहे. हेमंत कर्णिक यांची मुलगी आंध्र प्रदेश मधील मदनपल्ली जवळच्या जे. कृष्णमूर्ती यांनी स्थापन केलेल्या ऋषी व्हॅली स्कूलमध्ये सातवीपासून शिकते. तिथे करडी शिस्त, शिक्षकांबद्दल आदरभाव या मूल्यांपेक्षा स्वतंत्र विचार शक्ती, न पटल्यास उलट प्रश्न विचारण, वाद घालणं यांना उत्तेजन दिले जाते. ते म्हणतात, जरी उलट प्रश्न विचारण्याची तिला सवय असली तरी ज्ञान, अनुभव यात वडील असणाऱ्यांचे बोलणं मनावर घ्यावं अशी तिची सहज प्रवृत्ती आजवर होती. पण आता ती बदलत चालली आहे. हुशारीपेक्षा तिला नैतिक प्रामाणिकपणा अधिक महत्त्वाचा वाटू लागला आहे. आज ना उद्या ती माझ्या वागण्या, बोलण्याकडे पण लक्ष देणार आहे. मी सुद्धा तत्त्वाचा, शब्दाचा पक्का नाही हे समजून तिच्या मनात उतरणे मला त्रासदायक होईल, की तत्वाला मुरड घालावीच लागते हा निबरपणा तिच्यामध्ये आला तर मला जास्ती त्रास होईल हे आज तरी सांगता येत नाही. तिन असंच वाढत रहावं व वाढता वाढता मला मागे टाकून पुढे जाव यात माझ्यातल्या बापाला सुख आहे. मनोगतामध्ये काहीशा तटस्थपणे अनेक प्रसंगातून, अनुभवातून व्यक्तींचे गुण व अवगुणही मनोगतकारांनी उलगडले आहेत. तरीसुद्धा सर्व लेकींच्या मनोगतातून वडिलांविषयीचा जिव्हाळा व काळजी जाणवत राहते. लेखांमधून मुलींनी स्वतःचा शोधही घेतला आहे. अनुभवामुळे, परिस्थितीमुळे बनलेल्या स्वभावाच, विचारांचं, स्वतःच्या व वडिलांच्या वागण्याचं, नात्याच विश्लेषणही केले आहे. वेगवेगळे स्वभाव, घरातील व घराबाहेरची परिस्थिती, यामुळे बनलेली नाती यामुळे सर्वच मनोगत वैशिष्टपूर्ण व उठावदार बनली आहेत. पुस्तक वाचताना वाचकही त्यांच्या अनुभवाशी जोडले जातात. काही गोष्टी शिकतात. काही अनुभव वाचताना वाचकांना आपल्या मनाची स्पंदनही जाणवतात आणि ते अंतर्मुख होतात. बापलेकींचे मनोगते व काही विवेचनात्मक लेख यामुळे यामुळे बापलेकींचे काहीसे दुर्लक्षित नाते अनेक अंगानी व वेगवेगळ्या दृष्टिकोनातून उमजत जाते. हे नातं भविष्यात आणखी परिपक्व व सकारात्मक होईल अशी उभारी मिळते.



# ढगाळ वातावरणाचा रब्बीला फटका

## शेतकरी हवालदिल

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** गेल्या चार ते पाच दिवसांनी ढगाळ वातावरण आहे याचा फटका रब्बी पिकाला बसत आहे. तुर, गहु, सह हरभऱ्याला सगळ्यात जास्त फटका ढगाळ वातावरणामुळे बसल्याचे दिसून येत आहे. खरीप हंगामाच्या वेळेस पीक कापणीच्या ऐन वेळेस अतिवृष्टीचा फटका शेतकऱ्यांना बसला त्यातून शेतकरी कसाबसावरत नाही तर त्यातच आता ढगाळ वातावरणामुळे हरभऱ्याची पिक पिवळे पडत असून जळताना दिसत आहे. तसंच तुरीचे बाबतीतही झालेला आहे. तुरीचे फुलही या ढगाळ वातावरणामुळे खाली गळून पडत आहे. अश्यातच अजून अतिवृष्टीचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झालेले नसून त्यातच कधी अस्मानी तर कधी सुलतानी संकटाला एका पाठोपाठ एक शेतकऱ्यांना तोंड द्यावा लागत आहे. यामुळे शेतकरी हवालदील झालेला असुन अशातच शेतकऱ्यांना धीर देण्याची आज गरज आहे. यामुळे सरकारने शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या वतीने योग्य ते मार्गदर्शन करून मदत करावी अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे. शेतकऱ्याची शेती ही सर्वतः निसर्गावर अवलंबून असते आता हे ढगाळ वातावरण अजून किती दिवस राहील हे सांगता येत नाही.

# प्रयोगशील शिक्षक शंकर भामेरे यांना एम.फिल.

आधुनिक केसरी न्यूज



**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथील येथील महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयातील प्रयोगशील शिक्षक शंकर रंगनाथ भामेरे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे शिक्षण शास्त्र विषयात एम.फिल.पदवी जाहीर झाली. त्यांनी विद्यापीठाच्या शिक्षण शास्त्र विभागाचे जेष्ठ प्राध्यापक डॉ. सुहास पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या वर्षी जळगाव जिल्ह्यातील पहूर गावातील इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषेच्या शब्द संपत्तीवर होणाऱ्या भाषिक खेळांच्या परिणामकारकतेचा अभ्यास या विषयावर संशोधन प्रकल्प विद्यापीठास सादर केला होता. शंकर रंगनाथ भामेरे हे पहूर येथील सावित्रीबाई फुले विद्यालयात गेल्या १७ वर्षांपासून इंग्रजी विषयाचे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. कोरोना महामारीमुळे विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान भरून काढण्यासाठी विविध भाषिक खेळ मोलाचे ठरत आहेत. त्यांनी इंग्लिश लर्नर्स क्लब स्थापन करून विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी विषयाची आवड निर्माण केली आहे. त्यांनी विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदा आणि चर्चासत्रांमध्ये शोध निबंध सादर केले असून सध्या ते दिल्ली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या इंग्रजी विभाग आणि आयनेट संस्थेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण विद्यार्थ्यांच्या क्षमता वृद्धीसाठी सुरू असलेल्या ( इ एल टी ) राष्ट्रीय संशोधन प्रकल्पात सहभागी झाले आहेत . नागपूर येथे या प्रकल्पाची कार्यशाळा नुकतीच पार पडली . शिक्षणशास्त्रात संशोधन करण्याची ईच्छा असल्याचे त्यांनी बोलताना सांगीतले.



# सह्याद्री प्रतिष्ठान दुर्गसेवकांचा मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**चाळीसगाव :** सह्याद्री प्रतिष्ठानच्या राज्यभरातील गडकिल्ले सवर्धन कार्यात सहभागी असलेल्या दुर्गसेवकाचा मेळावा दि 11रोजी चाळीसगाव येथे पार पडला. या मधे छत्रपती शिवाजी महाराज याची पालखी मिरवणूक व शाहिर पोवाड्याच्या कार्यक्रमाने सम्पूर्ण परीसर शिव जागराने रमूण गेला चाळीसगाव येथे बालाजी लॉन्स येथे हा कार्यक्रम पार पडला यामधे सम्पूर्ण महाराष्ट्रातील दुर्गसेवक तथा दुर्गसेविका सहभागी झाले.त्या नतर दीपप्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतिमेचे पुजन व मुंबई येथिल शाहीर प्रवीण फणसे बाल शाहिरा शर्विका, बालशाहिर वीर फणसे याच्या बहादर पोवाड्याने परीसर रमला यावेळी मेळाव्यात उपस्थित असलेले चाळीसगाव जिल्याचे खासदार उन्मेश दादा पाटील,माजी न्याय मुर्ती सगितराव पाटील, माजी न्याय मुर्ती लोढे, सामाजिक कार्यकर्ते दिव्याग मित्र वर्धमान धाडिवाल, डॉक्टर रणजीत पाटील, सह्याद्री प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष हूकूम गूरूवर्य श्रमिक गोजमगूडे सर यांनी मनोगत व्यक्त केले प्रतिष्ठानचे राज्यप्रशाषक संगमेश्वरस्वामी यानी सह्याद्री प्रतिष्ठानच्या गेल्या बर्षाभरातिल कामाचा अहवाल वाचवून दाखवला या कार्यक्रमात सह्याद्री प्रतिष्ठान च्या महाराष्ट्रभरातील शाखेचे प्रतिनिधी एकत्रित असल्याने पुढिल वर्षभरात करायवयाचे दुर्गसवर्धन मोहिमाचे नियोजन आणी रूपरेषा आखण्यात आली व श्रमिक सर यानी आपल्या मार्गदर्शनातून दुर्गसेवकाना दिली.कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रतिष्ठान चे माजी अध्यक्ष दिलीप घोरपडे यांनी केले व यामधे चाळीसगावच्या सर्व दुर्गसेवकाचे मोलाचे योगदान व महाराष्ट्रभरातील दुर्गसेवाचे पण व या मधे छत्रपती संभाजीनगर मधून दुर्गसेवकनी हजेरी लावली यावेळी डॉ. पवन गिरी, शिवराज पाटील, जगदिश कचार, आकाश बारगळ, महेश भिगारे, अरूण थोरात, सचिन वाडेकर,विष्णू भिगारे,अनिल तिळवन, सागर शेजूळ,सचिन पानसरे,अमोल भिगारे व (महिला सावली भिगारे, प्रतिक्षा वलकूदे) आकाश बारगळ(रत्नापूर) गंगा मते, अविनाश काळे, अमोल फदाडे,आकाश चौधरी, संतोष चव्हाण, स्वप्नील बोरकर, पवन शोष्टे आदिंनी हजेरी लावली.

# माजी आ. भाऊसाहेब चिकटगावकर यांनी घड्याळ सोडून बांधले शिवबंधन

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** ठोंबरे काका पुतणे यांना राष्ट्रवादी पक्ष प्रवेश दिल्यामुळे नाराज झालेले वैजापूर राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार भाऊसाहेब चिकटगांवकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला खो दिला असून समर्थकांसह शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे या पक्षात जाण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता.

आज बुधवारी (ता.14) सकाळी मुंबईत मातोश्रीवर पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांचा प्रवेश सोहळा संपन्न झाला असून यावेळी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते शिवसेना ठाकरे गटाचे आ. अंबादास दानवे व सहसंपर्क प्रमुख जेष्टनेते आसाराम पाटील रोठे, शिक्षण सभापती अविनाश पाटील गलांडे, तालुका प्रमुख बंडू वाणी आदी सह कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. चिकटगांवकर यांच्या शिवसेना ठाकरे गटात प्रवेशामुळे वैजापूरात राजकीय समीकरण नक्कीच बदलणार असून राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार भाऊसाहेब पाटील चिकटगांवकर व त्यांच्या समर्थकांचा विरोध असूनही पक्षश्रेष्टींनी ठोंबरे काका - पुतण्याला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश दिल्याने माजी आमदार भाऊसाहेब पाटील चिकटगांवकर यांनी नाराजी व्यक्त करून सर्व पर्याय खुले असल्याचे पत्रकार परिषदेत सांगितले होते. त्यानंतर त्यांनी संपूर्ण वैजापूर तालुक्यात संपर्क दौरा आयोजित करून पुढे काय करावे पक्ष सोडावा की नाही ? पक्ष सोडल्यास कोणत्या पक्षात प्रवेश घ्यावा. यासंदर्भात कार्यकर्ते व समर्थकांची मते जाणून घेतली होती शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे या पक्षांमध्ये प्रवेश घ्यावा असे मत या दौऱ्यात कार्यकर्त्यांनी व्यक्त केले होते. त्यामुळे माजी आमदार चिकटगांवकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय घेतल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होती. दरम्यान विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदी निवड झाल्याबद्दल शिवसेना ठाकरे गटाचे आ.अंबादास दानवे व सहसंपर्कपदी नियुक्ती झाल्याबद्दल जेष्टनेते आसाराम पाटील रोठे यांचा माजी आमदार चिकटगांवकर यांनी सत्कार केला व त्यांच्याशी प्रवेशासंदर्भात चर्चा होती. त्यामुळे त्यांचा शिवसेना ठाकरे गटात प्रवेश निश्चित मानला जात होता अन अखेर चिकटगांवकर यांच्या प्रवेशाला मुहूर्त सापडला असून आज बुधवारी (ता.14) मुंबई येथे मातोश्रीवर उध्दव ठाकरे यांच्या उपस्थितीत आपल्या समर्थकांसह शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश प्रवेश घेणार असल्याची जोरदार चर्चा वैजापूरात बघावयास मिळत होती अखेर पक्ष प्रवेशानंतर त्यास पूर्ण विराम मिळाला.

# सिल्लोड येथे 1 जानेवारीपासून महोत्सवाचे आयोजन करा : सत्तार

आधुनिक केसरी न्यूज



**सिल्लोड :** येथे येत्या 1 जानेवारीपासून सिल्लोड महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने शासनाच्या विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपापले कार्यालय तसेच नगर परिषदेने शहरातील प्रत्येक चौकात तसेच दुभाजकांवर व सार्वजनिक ठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई, लायटिंग सह सुशोभीकरण करावे तसेच शहर वासीयांनी देखील आपले घर, व्यापार व संस्थेस लायटिंग व सजावट करावी असे आवाहन कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी केले आहे. सिल्लोड मध्ये कोणत्याही प्रकारचे उत्सव मेळावे होत नसल्याने सिल्लोड महोत्सव साजरा करण्यात येत आहे. हा महोत्सव दिशा दर्शक ठरावा यासाठी सर्वांनी एकत्र येऊन महोत्सवात सहभागी व्हावे असे देखील मंत्री अब्दुल सत्तार म्हणाले. सिल्लोड येथे 1 जानेवारी पासून सुरू होणाऱ्या सिल्लोड महोत्सवाच्या अनुषंगाने कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी आज सिल्लोड शहरातील सांस्कृतिक कार्यक्रम, व कृषी महोत्सवाच्या नियोजित मैदानाची पाहणी केली. तसेच त्यानंतर सिल्लोड नगर परिषदेच्या सभागृहात सिल्लोड महोत्सवाबाबत आढावा घेतला. याप्रसंगी कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी वरील अवाहन केले.

यावेळी जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष नितीन पाटील, उपाध्यक्ष अर्जुन पा. गाढे, युवानेते तथा उपनगराध्यक्ष अब्दुल समीर, बाळासाहेबांची शिवसेनेचे तालुकाप्रमुख देविदास पा.लोखंडे, नगराध्यक्षा श्रीमती राजश्री निकम, नॅशनल सुत गिरणीचे व्हाईस चेअरमन नरेंद्र (बापू) पाटील, संचालक राजेंद्र ठोंबरे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष दुर्गेश जैस्वाल, धन्वंतरी असोसिएशनचे डॉ. निलेश मिरकर, हाजी मोहमद हनिफ, मुश्ताक देशमुख, प्रवीण कटारिया, शेख इम्रान (गुड्डू), मुख्याधिकारी सय्यद रफिक, नगरसेवक विठ्ठल सपकाळ, रउफ बागवान, शंकरराव खांडवे, सत्तार हुसेन, सुधाकर पाटील, अकिल वसईकर, प्रशांत क्षीरसागर, आसिफ बागवान, सुनील दुधे, जुम्मा खा पठाण, राजू गौर, रईस मुजावर, रतनकुमार डोभाळ, शेख सलीम हुसेन, जितू आरके, मोईन पठाण, मनोज झंवर, मतीन देशमुख, बबलू पठाण यांच्यासह वीज वितरण विभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता विश्वनाथ लहाने, अभियंता सचिन बन्सोडे, अनिल सैवर, न.प. उप मुख्याधिकारी सुनील गोराडे, प्रशासकीय अधिकारी अजगर पठाण, प्रकल्प अधिकारी देवेंद्र सूर्यवंशी, अभियंता अश्विन चव्हाण, राहुल राजपूत, शेख सलमान, शेख अजीम आदींची उपस्थिती होती.

# पोलीस विद्यार्थी सुसंवाद मेळावा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** या मेळ्यात सर्व शाळेतील मोजके विद्यार्थीनी सर्व प्राध्यापक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते या मेळाव्यात दामिनी पथक, पोलीस काका/ पोलीस दीदी, सायबर क्राईम अवेअरनेस प्रोग्राम, डायल 112 प्रोजेक्ट, स्टुडन्ट पोलीस कॅडेट प्रोग्राम, ट्राफिक अवेअरनेस हे सर्व प्रोग्राम नव्याने आधुनिक पद्धतीने सुरुवात करून याची संपूर्ण सखोल माहिती देण्यात आली. व जिल्ह्यातील जिल्हाधिकारी जलद शर्मा यांच्या नेतृत्वाखाली अमली पदार्थ विरुद्ध शपथविधी घेण्यात आली.

धुळे जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा करून मनमोकळेपणाने त्यांच्याशी संवाद साधला व त्यांच्या मनात पोलिसांबद्दल असणारी भीती दूर करण्यात आली. पोलीस काका पोलीस दीदी ही सायबर क्राईम प्रमाण वाढल्यामुळे जनजागृती करणे हा हेतू आहे विद्यार्थ्यांचे कमी वय असताना कोणीही ड्राईव्ह करू नये किंवा लायसन नसताना नियमांचे पालन करावे व वाहतूक पोलिसांना आपल्या नियमाने मदत करून त्यांना सहकार्य करावे, असे उपाधीक्षक किशोर काळे यांनी सांगितले.

सायबर क्राईम बद्दल आपले फेसबुक इन्स्टा व इतर सोशल मीडियातील ॲप्स येथील फोटो प्रायव्हसी मध्ये ठेवावेत जेणेकरून तुमचे फोटो कोणीही वायरल करू शकणार नाहीत. व तुम्ही कुठे गावाला जात असताना लोकेशन स्टेटस ठेवू नका जेणेकरून. तुमच्यावर हल्ल्याचे प्रमाण व चोरीचे प्रमाण कमी होईल. कुठल्याही लोन एप्लीकेशन ची लिंक आपल्या मोबाईलवर आल्यास ती ओपन करू नका किंवा असे संदेश आल्यास वारंवार त्रास होत असल्यास पोलिसांची मदत घ्या. कारण एका सेकंदामध्ये आपल्याला लोन देण्यासाठी सांगतात परंतु ॲप डाऊनलोड केल्याने आर्थिक व मानसिक पासून होत असते. यासाठी कुठलेही आधार नंबर किंवा मोबाईल नंबरची मागणी केल्यास आपल्या मित्र सहकारी व पालकांना याची माहिती कळवा. प्रत्येकाला आपले फोटो सोशल मीडिया साइटवर अपलोड करण्याची हौस असते परंतु देखावा करण्यासाठी मॉडलिंग चे फोटो लावतात व याचा गैरफायदा सोशल मीडिया हॅकर्स यांना होत असतो. व एखादी घाणेरड्या वेबसाईटवर अपलोड केला जातो त्यासाठी आपले फोटो प्रोफाइल सुरक्षित लॉक करणे गरजेचे असते. कुठल्याही शॉपिंग मॉल व कपड्यांच्या दुकानात गेल्यावर आधी कॅमेरे चेक करा किंवा सहजासहजी त्या दुकानात कपडे बदलण्यासाठी टाळाटाळ करा. व बिलिंग करताना त्या ठिकाणी आपला नंबर न देता पालकांचा नंबर द्यावा, ॲड. चैतन्य भंडारी यांनी सांगितले.

प्रत्येक गोष्टी पोलिसांनीच कराव्यात असे नाही आपणही आपले कर्तव्य बजावले पाहिजे आपण बाहेर निघताना ही काळजी घ्यावी विना लायसन गाडी चालवू नये हे आपले कर्तव्य आहेत. सोशल मीडियावरील फॉलोवर वाढवण्यासाठी आपण कित्येकदा नियमांचे उल्लंघन करत असतो त्यामुळे आणि ट्रॅप सारखे प्रकार घडत असतात. व अशा घटना घडल्यास दामिनी पथक सायबर पथक यांना कळविणे व प्रत्येकाने पोलीस काका / पोलीस दिदीचा नंबर प्रत्येकाने सेव करणे गरजेचे आहे. जर सोशल मीडियाचा वापर करायचा आहे तर दिवसातून फक्त एक तास भरपूर आहे. कारण आपण मोबाईलचा गुलाम होत असल्यामुळे घरच्यांना वेळ देऊ शकत नाही. विद्यार्थी विद्यार्थिनीच्या ताण तणाव असल्यामुळे आत्महत्येचा प्रयत्न करतात व आत्महत्याही करतात परंतु आत्महत्या न करता आपले जवळचे मित्र व आई-वडिलांना आपले मनोगत मोकळेपणाने व्यक्त करणे गरजेचे असते, असे चेतना काळे यांनी सांगितले.

# ग्रामपंचायत निवडणुका दारूमुक्त कराव्यात : चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यात होणाऱ्या सहा ग्रामपंचायतींच्या निवडणुका लक्षात घेता दारूच्या मागणीत वाढ होण्याची शक्यता आहे . यातून सामाजिक स्वास्थ बिघडण्याची भीती असल्याने या निवडणुका दारूमुक्त होण्यासाठी उत्पादन शुल्क विभाग आणि गाव पुढाऱ्यांनी पुढाकार घेण्याची गरज निर्माण झाली आहे . लग्न , वराती आणि निवडणुका हे दारू कशी घेतली जाते व कशी घ्यावयाची यासाठीचे विनामूल्य प्रशिक्षण केंद्र समजले जाते.या संधीचा फायदा घेत तरुण फुकटची दारू पिऊन सामाजिक स्वास्थ्य बिघडविण्याचे काम करीत असतात. यामुळे गावागावांत भांडणे, शिवीगाळ यांसारख्या घटना घडतात व कायमस्वरुपी वैरत्व वाढवून गाव दोन गटांत विभागले जाते.काही मुले आयुष्यभर दारूच्या आहारी जाऊन जीवन उद्ध्वस्त करुन घेतात.स्थानिक राजकारणाचा कणा समजल्या जाणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुका या महत्त्वपूर्ण आहेत.ग्रामीण भागातील राजकारणावर पकड मजबूत करण्याचे एक प्रभावी माध्यम आहे.त्यामुळे सर्वच प्रमुख राजकीय पक्ष या निवडणुकीत प्रामुख्याने आपल्या कार्याचा गाजावाजा करत आहेत. निवडणुका आल्या की सर्वच राजकीय पक्ष आपापल्या पद्धतीने निवडणुकीची तयारी करतात. गावाच्या विकासासाठी असलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुका या दारुमुळे भांडण वाढत असल्याचे आजवरचे चित्र आहे. त्यामुळे गावातील जाणत्या लोकांनी तथा राज्य उत्पादन शुल्क विभागाने दारूमुक्तीसाठी प्रयत्न करून उपाययोजना करणे गरजेचे आहे. अशी मागणी सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केली आहे.

# वरखेडी फाट्याजवळ भीषण अपघातात दोघांचा जागीच मृत्यू

## दोघे गंभीर जखमी जिल्हा रुग्णालयात दाखल

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** धुळ्यात मुंबई - आग्रा महामार्गावरील वरखेडी फाट्याजवळ काल रात्री एक भीषण अपघात झाला. यात एका ट्रकने दुसऱ्या ट्रकला धडक दिल्याने दोन व्यक्तींचा जागीच मृत्यू झाला आहे विजय पाटील आणि रमाकांत पाटील असे मयत व्यक्तींचे नाव आहेत. मृत्यू झालेले हे महिंद्रा कंपनीचे २ कर्मचारी होते यांना कंपनीने ट्रक दुरुस्तीसाठी पाठवले होते परंतु पुन्हा परतलेच नाहीत. त्यानंतर असे कळाले की महामार्गावरील वरखेडी फाट्याजवळ उशीरा रात्री एक विचित्र अपघात झाला. या अपघातात महिंद्रा कंपनीच्या २ कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू झाला अशी माहिती आझाद नगर पोलिसांनी दिली आहे. धुळे शहरातील मुंबई - आग्रा महामार्ग क्रमांक ३ येथे वरखेडी रोड येथे ट्रक बिघडला होता. तो दुरुस्त करण्यासाठी महिंद्रा कंपनीचे २ मेकॅनिक गेले होते. ट्रक दुरुस्तीचे काम महामार्ग येथे मेकॅनिकलसह अन्य तीन जण करत असताना याच दरम्यान मालेगावकडून धुळ्याकडे भरधाव वेगाने येत असलेल्या ट्रकने पुढील ट्रकला धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, त्या ट्रकने काही अंतरावर उभे असलेल्या दुरुस्तीचे काम करणाऱ्या ट्रकला जोरदार धडक दिली. यात मेकॅनिकल आणि त्याचा सहकारी रस्त्यावर फेकले गेले. ते दोघे रक्तबंबाळ झाले होते. त्यात दोघींचा जागीच मृत्यू झाला, अशी माहिती घटनास्थळी असलेल्या प्रत्यक्षदर्शींनी दिली.

या अपघाताची माहिती मिळताच आझाद नगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील आणि कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेतली. मयत दोघी आणि गंभीर अशा चौघांना तातडीने उपचारार्थ रुग्णवाहिकेतून हिरे रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, डॉक्टरांनी विजय पाटील आणि रमाकांत पाटील दोघे राहणार अवधान यांना मृत घोषित केले आणि दोघे गंभीर जखमींना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



# सिरसीकर यांना 'समाज भूषण' पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद रिसर्च सेंटर येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात नाशिकच्या तेजस फाउंडेशन तर्फे सुरेश सिरसीकर यांना समाज भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार जेष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ ऋषिकेश कांबळे, संस्थेच्या संस्थापक, अध्यक्षा मेघा डोळस, तिरंगा अकॅडमीचे किशोर राऊत व इतर मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला.

तेजस फाउंडेशन ही नाशिकची संस्था असून सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल ही संस्था दरवर्षी राज्यस्तरीय पुरस्कार देत असते. या संस्थेच्या संस्थापक व अध्यक्षा मेघा डोळस आहेत.

सुरेश सिरसीकर हे चित्रपट क्षेत्राशी संबंधित असून त्यांची होल्डिंग हँड्स नावाची सामाजिक संस्था देश पातळीवर काम करते. या निवडीचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी जेष्ठ साहित्यिक व विचारवंत ऋषिकेश कांबळे, संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष मेघा डोळस, मधुकर वैद्य, किशोर राऊत इत्यादी मान्यवर उपस्थित होते.



# पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त शेतीशाळा माध्यमातून रब्बी ज्वारी बाबत मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात पौष्टिक तृणधान्ये वर्षॉनिमित्त शेतीशाळा माध्यमातून रब्बी ज्वारी बाबत सोयगाव कृषी विभागाच्या वतीने नांदगाव व वरखेडी येथे मार्गदर्शन कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा मार्फत तालुका कृषि अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी बनोटी एस.जी. वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली रब्बी ज्वारी पिक शेतीशाळा मौजे – नांदगाव व वरखेडी बु येथे आयोजित करण्यात आलेल्या आहेत. पुढील वर्ष पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे करावयाचे असल्याने शेतीशाळा माध्यमातून पुढील वर्षाची पूर्वतयारी म्हणून प्रचार व प्रसिद्धी करण्यात येत आहे. सदरील शेतीशाळा मौजे – नांदगाव येथे दिनांक – २७-१०-२०२२ ते २६-०१-२०२३ तसेच मौजे वरखेडी खु येथे दिनांक – २३-१०-२०२२ ते २७-०१-२०२३ या कालावधीत राबविण्यात येत असून यात रब्बी ज्वारी पिकातील विविध अवस्थांचा विचार करून त्यानुसार बियाणे खरेदी करताना घ्यावयाची काळजी, शेतकरी निवड, माती व पाणी परीक्षण, जमीन आरोग्य पत्रिकेनुसार खतांचा वापर, कामगंध सापळयांचा वापर, मित्रकीटक माहिती, किड व रोग व्यवस्थापन, किटकनाशक फवारणी करताना घ्यावयाची काळजी, उत्पादन खर्च ताळेबंध या बाबतची माहिती वर्गवार देण्यात येत आहे.

आज दिनांक १४-१२-२०२२ रोजी मौजे – नांदगाव येथे रब्बी पिक शेतीशाळेचा वर्ग आयोजित करण्यात आलेला होता यात प्रामुख्याने एच.बी.देशमुख कृषि पर्यवेक्षक, ए.एस.महाजन बी.टी. एम, एस.जी.वाघ कृषि सहाय्यक तिडका, एस.आर.पाटील कृषि सहाय्यक बहुलखेडा यांनी मार्गदर्शन केले तसेच आजच्या शेतीशाळा वर्गास गावातील सरपंच व उपसरपंच व प्रगतीशील शेतकरी, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# लहान मुलांना घेऊन भिक्षा मागणाऱ्या भिक्षेकरी यांचे पुनर्वसन व्हावे : आ. फारुख

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील विविध धार्मिक ठिकाणी लहान मुलांना घेवून भिक्षा मागणाऱ्या महीलांचे व भिक्षेकरी यांचे पुनर्वसन व्हावे, अशी मागणी आमदार फारुख शाह यांनी जिल्हा महीला बाल विकास अधिकारी यांच्याकडे केलेली आहे. त्या पत्रात त्यांनी मागणी केली आहे की, महाराष्ट्र शासनाच्या धोरणाप्रमाणे महीला व बालके व भिक्षेकरी यांचे पुनर्वसन होणे फार गरजेचे आहे. परंतु शासनाचे धोरण प्रभावीपणे शहरात राबविले जात नाही असे दिसते. शहराच्या विविध धार्मिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात महीला लहान बाळांना घेवून भिक्षा मागताना दिसतात. काही महीला बुरखे घालून लहान बाळांना घेवून भिक्षा मागताना दिसतात. शासनाच्या नियमाप्रमाणे भिक्षा प्रतिबंध अधिनियम १९५९ या अधिनियमाची अंमलबजावणी धुळे शहरात होताना दिसत नाही. अशा भिक्षेकरी महिला व बालकांचे पुनर्वसन करून त्यांना अन्न, वस्त्र, निवारा व वैद्यकीय सेवा व व्यवसाय प्रशिक्षण देवून त्यांचे पुनर्वसन करण्यात यावे असे शासनाचे धोरण असताना सुद्धा धुळे शहरात त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही आहे. तसेच भिक्षा मागणाऱ्यासाठी शहरात किवा जिल्ह्यात पुनर्वसन केंद्र दिसत नाही. तरी भिक्षागृह व पुनर्वसन केंद्रासाठी विभागामार्फत शासनाकडे मागणी करण्यात यावी व तत्काळ त्याची अंमलबजावणी होवुन भिक्षेकरी महिला व बालके यांचे पुनर्वसन होऊन त्यांना चांगला दर्जा मिळावा म्हणून विभागामार्फत प्रयत्न करण्यात यावे अश्या आशयाचे पत्र शाह यांनी जिल्हा महीला व बाल विकास अधिकारी यांना दिले आहे.

# मराठा समाजाने जागरूक राहिले पाहिजे

## अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे

आधुनिक केसरी न्यूज

**संगमनेर :** लव्ह जिहादचा मोठ्या प्रमाणात धोका वाढला असून मराठा समाजातील मुली त्याचे बळी ठरत असून समाजाने यासाठी जागरूक राहिले पाहिजे असे आवाहन अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे यांनी केले आहे.

संगमनेर येथील विश्रामगृह येथे आयोजित नगर जिल्हा कार्यकर्ता आढावा बैठकीत श्री.कोंढरे बोलत होते. यावेळी दक्षिण जिल्हाध्यक्ष शिवाजी डौले, उत्तर नगर जिल्हाध्यक्ष लालूशेठ दळवी, जिल्हा सरचिटणीस भाऊसाहेब वाकचौरे पाटील, राहुरी तालुकध्यक्ष संगमनेर भाऊसाहेब वराळ, राहता तालुकाध्यक्ष प्रकाश निर्मळ, अजय हासे, साहेबराव दातखिले आदी उपस्थित होते.


कोंढरे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, अखिल भारतीय मराठा महासंघाचे माध्यमातून अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळतून युवकाना कर्ज मिळवून देण्याबरोबर व्यवसायिक मार्गदर्शन केले पाहिजे. सारथी ची शिष्यवृत्ती विध्यार्थी ना मिळाली अन त्यातून आय.एस, आय.पी.एस मराठा अधिकारी निर्माण झाले तर समाजासाठी मोठे कार्य होईल. या दोन्ही योजना आरक्षणामुळे होणाऱ्या फायद्यासारखे आहेत.



मराठा समाजाला आता सुधारण्याची गरज असून सध्या पद्धतीने लग्न करावे. मानपानाच्या नादी न लागत मुलबाळ यांचे शिक्षणाकडे लक्ष द्यावे, आपले मुलांचे लग्न ठरवित असताना त्याची पूर्ण खात्री करावी, खरंच तो नोकरीला आहे का? पगार खरा सांगितला आहे का? त्यांनी सांगितलेली स्थावर मालमत्ता त्यांचीच आहे का? या गोष्टी तपासले तर नंतर पश्चताप करण्याची वेळ येणार नाही.

यावेळी राहुरी तालुकाध्यक्षपदी राहुरी चे माजी उप नगराध्यक्ष श्री नगराध्यक्ष दिनकर पवार यांची निवड झालेबद्दल श्री.कोंढरे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. अखिल भारतीय मराठा महासंघाचे सोशल मीडिया च्या माध्यमातून अडीच लाख नागरिकापर्यन्त पोहचणार कुटुंब ॲप बनविले बद्दल भाऊसाहेब वाकचौरे पाटील यांचे विशेष अभिनंदन श्री. राजेंद्रजी कोंढरे यांनी यावेळी केले.

# अवकाळी पावसामुळे आरोग्याची भीती



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राज्यातील अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. यामुळे अनेकांच्या आरोग्यावर परिणाम पडला आहे थंडी ताप येणे सर्दी खोकला याचा परिणाम लहान बालकांवर जास्त दिसून येत आहे. व दवाखाने गच्च भरल्याचे दिसत आहे. जास्त फटका शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर बसला आहे . प्रामुख्याने धुळे जिल्ह्यात पडलेल्या अवकाळी पावसाने रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले. धुळे -शिरपूर इतरही अनेक भागांमध्ये गारांचा पाऊस पडला. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता अधिक वाढली आहे. अचानक आलेल्या पावसामुळे अनेकांचे उद्योगधंद्यांवर परिणाम पडत असतो. धुळे हा कापूस आणि कडधाण्याचा उद्‌पादकांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. अनेक शेतकरी कडधान्याची थेट निर्यात करतात. तर काही शेतकरी तुर सुखवून त्यापासून उत्पादन करतात. अशा प्रकारे अचानक पाऊस आला तर शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले.

# मालिनी वसंतराव पुरोहित यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथील महिला समाज या प्रतिष्ठित



शैक्षणिक संस्थेच्या सचिव म्हणून त्यांनी काम केले. या संस्थेच्या सरस्वती विद्या मंदिर मधील विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता. तसेच शहरातील अनेक सामाजिक संस्थांशी त्या संलग्न होत्या. मागील काही वर्षांपासून त्यांचे वास्तव्य औरंगाबाद येथे होते. त्यांच्या इच्छेनुसार औरंगाबाद येथील महात्मा गांधी मिशन रुग्णालय व महाविद्यालय येथे त्यांचे देहदान करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुली, जावाई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

# संत्र्यावर 'कोळशी'चं संकट

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** विदर्भात संत्र्यावर 'कोळशी' या काळ्या माशीपासून होणाऱ्या रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळं संत्र्याच्या बागा संकटात सापडल्या आहेत. उत्पादक शेतकरी सध्या चिंतेत आहेत. कारण संत्र्यावर 'कोळशी' या काळ्या माशीपासून होणाऱ्या रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळं संत्र्याच्या बागा संकटात सापडल्या आहेत. तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार नागपुरात जवळपास 30 ते 40 टक्के संत्र्याच्या बागा या कोळशीच्या प्रादुर्भावात अडकल्या आहेत. संत्रा उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. कोळशीच्या प्रादुर्भावामुळं वर्षानुवर्षे जोपासलेल्या संत्र्याच्या बागाही पुढील वर्षांसाठी संकटात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# रांजणगावच्या (पोळ)बैलगाडा शर्यत निफाडच्या गाड्याने जिंकली

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** ढाल व रेन्जर सायकल हे युवक काँग्रेसचे हंन्सीभाई व रावसाहेब बोडखे मित्र मंडळ यांच्यावतीने अंतिम विजेते करीमशेठ घोडेवाले निफाड यांना बक्षिस सुपर्द करण्यात आले. अंतिम बक्षीस गंगापूर तालुक्यातील राजंनगाव पोळ येथे श्री काशी विश्वनाथ महाराज यात्रा महोत्सव निमित्ताने बैलगाडा शर्यतचे आयोजन गावाकर्यांच्या वतीने करण्यात आले होते या बैलगाडा शर्यतीच्या स्पर्धेतील अंतिम बक्षिस ढाल व रेन्जर सायकल हे युवक काँग्रेसचे हंन्सीभाई व रावसाहेब बोडखे मित्र मंडळ यांच्यावतीने अंतिम विजेते करीमशेठ घोडेवाले निफाड यांना बक्षिस सुपर्द करण्यात आले.



# कुटुंबाचे संवर्धन व चिरंतन कल्याणासाठी कुटुंब प्रबोधन महत्वाचे



आधुनिक केसरी न्यूज


**पुणे :** नुकत्याच झालेल्या श्रद्धा वालकरच्या अमानुष हत्याकांडाच्या निमित्ताने पाल्य आणि पालकांनी अंगिकारलेली आधुनिक जीवनपद्धती, आपल्या कुटुंब व्यवस्थेत एकंदरच आलेला बेबनाव, मुलांची बदलत चाललेली मानसिकता, वेगाने ढासळत चाललेली लग्न संस्कृती, समाज व्यवस्थेबाबतची उदासिनता अशा अनेक ज्वलंत विषयांवर विस्तृत चर्चा करण्यासाठी वेदांत सांस्कृतिक मंच, कर्वेनगर तर्फे, कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेच्या इचलकरंजी सभागृहामध्ये शनिवार, १० डिसेंबर रोजी सायंकाळी सर्व वयोगटासाठी ‘आधुनिक कुटुंब - वास्तव आणि अपेक्षा' या विषयावर एका खुल्या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. आजच्या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते समुपदेशक व कुटुंब प्रबोधन पश्चिम प्रांत प्रमुख संजय कुलकर्णी यांनी श्रोत्यांशी संवाद साधला. परिसंवादाच्या समारोप प्रसंगी आपल्या भाषणात ते म्हणाले," बाह्य जगातील आर्थिक,सामाजिक आव्हाने,समाजातून जाणीवपूर्वक उभे केलेले चुकीचे विमर्श व परिणामी वाढीस लागलेली स्वकेंद्रित व भोगवादी,चंगळवादी वृत्तीमुळे समाजामध्ये पुन्हा एकदा कुटुंब प्रबोधनाचे कार्य हाती घेणे आवश्यक झाले आहे." या कार्यक्रमाला शिक्षक, पालक, समुपदेशक, राजकीय कार्यकर्ते, पोलिस अधिकारी यांच्या बरोबर कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या विद्यार्थिनींनीही मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. संजय कुलकर्णी यांनी मुलींकडूनच आधुनिक, कुटुंब, वास्तव आणि अपेक्षा या शब्दांच्या संकल्पना काढून घेतल्या. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात सुरुवात झाल्यामुळे विद्यार्थिनींचा सहभाग वाढतच राहिला."जास्त आधुनिकतेच्या आहारी न जाता,आपल्या कुटुंबाबरोबर सुसंवाद साधून त्यांच्या आपल्याबद्दलच्या अपेक्षा काय आहेत ते जाणून घेऊन आपल्याही त्यांच्याकडून काय अपेक्षा आहेत याचा जाणीवपूर्वक विचार करावा आणि सध्या तरी अभ्यासावर लक्ष केंद्रीत करावे" असे आवाहन संजय कुलकर्णी यांनी यावेळी केले. या कार्यक्रमास महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष स्मिता घैसास,उपाध्यक्ष विद्या कुलकर्णी, शास्त्री सर, नगरसेवक राजाभाऊ बराटे, नगरसेविका मंजुश्री खर्डेकर आणि सौ. फरांदे, समुपदेशक मिताली सावळेकर आणि मेधाताई भोजकर,पोलीस उप निरीक्षक तृप्ती पाटील आणि स्नेहलता जाधव यांची मुख्य उपस्थिती होती.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in